रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १८३
www.ramprahar.com

◆सोमवार, १९ जानेवारी २०२६◆ पाने ८ ◆किंमत ₹ २

## मलंगगडावरील फ्युनिक्युलर ट्रेन सुरू; भाविकांना सुविधा



**कल्याण :** येथून जवळच असलेल्या मलंगगडावरील बहुप्रतिक्षित फ्युनिक्युलर रेल्वे अखेर सुरू झाली आहे. भाजपचे आमदार किसन कथोरे आणि आमदार सुलभा गायकवाड यांच्या उपस्थितीत फ्युनिक्युलर रेल्वेचा शुभारंभ झालाय. यामुळे भाविकांना मलंगगडावर जाण्यासाठी लागणारा दोन तासांचा पायी प्रवास आता अवघ्या सात मिनिटांवर आलाय. मलंगगड हे ठाणे जिल्ह्यातील हिंदू-मुस्लिम भाविकांचे प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगेत असलेल्या मलंगगडावर जाण्यासाठी भाविकांना दोन तासांची पायपीट करावी लागते. त्यामुळे आमदार किसन कथोरे यांनी स्वित्झर्लंडच्या धर्तीवर याठिकाणी फ्युनिक्युलर रेल्वेचा प्रस्ताव मंजूर करवून घेतला होता. या ट्रेनमुळे मलंगगडावर येणाऱ्या भाविकांच्या संख्येत मोठी वाढ होईल तसेच येथील पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

**अंतरंग**

परदेशी नागरिकांचे बेकायदा वास्तव्य; घरमालकांवर गुन्हा/३

खोपोली काळोखे हत्याकांडप्रकरणी आणखी एका आरोपीला अटक/५

बोरघाटात दोन ट्रकच्या धडकेत चालक, क्लीनर जागीच ठार/७

# सुकापूरमध्ये लाडकी बहीण मेळावा

## महिलांचे स्वावलंबनाकडे पाऊल -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**पनवेलजवळील सुकापूर येथे एकता मित्र मंडळ, तिरंगा मित्र मंडळ आणि माऊली प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १७) आयोजित करण्यात आलेला लाडकी बहीण मेळावा अत्यंत भव्य दिव्य स्वरूपात पार पडला. या मेळाव्याला कार्यसम्राट आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती दर्शवून महिला भगिनींना मार्गदर्शन करताना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा घेतला.**





या मेळाव्याला भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, पाली देवद ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिवेश भगत, सदस्य महेश पाटील, उदय म्हस्कर, महेश केणी, माजी उपसरपंच आलुराम केणी, राहुल पोपेटा, नेताजी पाटील, हनुमंत खुटले, योगेश पाटील, प्रशांत गांगर्डे, शशिकांत पाटील, मनोहर भोपी, प्रमोद सावंत, प्रवीण सावंत, रूपेश पाटील, प्रितेश मोरे, सरपंच ज्योती केणी, माजी सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच मेनका खुटले, ग्रामपंचायत सदस्य पुष्पा म्हस्कर, प्राची जाधव, माजी ग्रामपंचायत सदस्य भारती भगत, वैशाली सावंत, उषा पाटील, शामली भगत, निकिता पाटील, रश्मी पाटील, भारती पोपेटा, शिल्पा केणी, मिनाक्षी केणी, पूजा सावंत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्याचे विशेष आकर्षण महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व खेळ पैठणीचा ठरला, ज्याला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, सन २०१४पासून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला सक्षमीकरणासाठी उचललेल्या क्रांतिकारी पावलांचा उल्लेख करताना जनधन खाते, आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीमुळे सरकारी योजनांचा लाभ आता कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याचे आवर्जून सांगितले.

राज्यातील महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना दरमहा मिळणाऱ्या १५०० रुपयांच्या आर्थिक मदतीने अनेक भगिनींनी स्वतःचे छोटे व्यवसाय सुरू करून स्वावलंबनाकडे पाऊल टाकले आहे, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी काढले. **(पान २ वर..)**

### जनतेने जि.प., पं.स. निवडणुकीतही साथ द्यावी

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकूण ७८ जागांपैकी ५९ जागांवर महायुतीने निर्विवाद विजय मिळवला असून त्यापैकी ५५ जागा एकट्या भाजपने जिंकल्या आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीला साध्या २० जागांचा टप्पाही गाठता आलेला नाही. हा सर्वसामान्य जनतेचा आणि महिलाशक्तीचा आशीर्वाद असल्याचे सांगत येणाऱ्या ५ तारखेला होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीतही भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी जनतेने असाच पाठिंबा द्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले.

## आजपासून दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषद

# मुख्यमंत्री शिष्टमंडळासह दाखल

**झ्युरिक : वृत्तसंस्था**



स्वित्झर्लंडमध्ये सोमवार (दि. १९)पासून सुरू होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी दावोस येथे पोहचले. उद्योगमंत्री उदय सामंत आणि प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे पथक मुख्यमंत्र्यांसमवेत आहे.

या परिषदेदरम्यान, जागतिक उद्योग गट, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाईल. भारताचे विकास इंजिन म्हणून जागतिक मंचावर मॅग्नेटिक महाराष्ट्र अभियानाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाच्या पत्रकात म्हटले आहे.

या परिषदेसाठी दावोसमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत तीन हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी होणार आहेत. 'अ स्पिरिट ऑफ डायलॉग' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

दरम्यान, झ्युरिक विमानतळावर केंद्रीय मंत्री के. राममोहन नायडू आणि प्रल्हाद जोशी यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

## हळदी समारंभात विषबाधा, लग्न रद्द

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणच्या हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीमध्ये हळदी सभारंभात जेवण केल्याने ४० ते ५० लोकांना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. वधूसह आई, बहीण यांनादेखील ही विषबाधा झाली आहे. पाहुण्यांना विषबाधा झाल्याने लग्नच रद्द करण्यात आले आहे.

वधूचे वडील संजित बाविस्कर यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात धाव घेतली. कॅटर्सविरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली. या घटनेमुळे कल्याणमध्ये खळबळ उडाली आहे.

## भाजपचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्याचे माजी मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचे रविवारी (दि. १८) मुंबईत प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते.

पुरोहित यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवकपदापासून केली. त्यानंतर विधानसभेत त्यांनी २५ वर्षे आमदार म्हणून काम केले. ते मुंबईतील मुंबादेवी आणि कुलाबा विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४मध्ये झालेल्या निवडणुकीत निवडून आले होत. १९९५ ते १९९९दरम्यान युती सरकारमध्ये त्यांनी कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्यमंत्री म्हणून जबाबदारी पाहिली तसेच नंतर गृहनिर्माणमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. ते काही काळ भाजपचे मुंबई अध्यक्षही होते. नुकत्याच झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत त्यांचे पुत्र आकाश पुरोहित निवडून आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर नेत्यांनी पुरोहित यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

## निवडक

### प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी युरोपियन पाहुण्यांना निमंत्रण

**नवी दिल्ली :** ७७व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होणार आहे. महाराष्ट्राच्या वतीने गणेशोत्सव आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेतून साकारलेल्या भव्य चित्ररथाचे संचलन होईल.

### जागतिक बौद्ध शिखर परिषद २४ जानेवारीपासून नवी दिल्लीत

**नवी दिल्ली :** केंद्रीय संस्कृती मंत्रालय आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघाच्या संयुक्त विद्यमाने २४, २५ जानेवारी रोजी नवी दिल्ली दुसरी जागतिक बौद्ध शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे. दोन दिवसांच्या या शिखर परिषदेत सुमारे २०० प्रतिनिधी सहभागी होत असून यात सर्वोच्च कुलगुरू, राष्ट्रीय बौद्ध संघांचे प्रमुख, प्रख्यात भिक्षू, विद्वान आणि जगभरातील ज्येष्ठ मान्यवरांचा समावेश असेल. ही परिषद सामूहिक ज्ञान, संयुक्त आवाज आणि परस्पर सहअस्तित्व या संकल्पनेवर होत आहे.

# भाजप देशाची पहिली पसंती

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन

**कालियाबोर (आसाम) : वृत्तसंस्था**



भारतीय जनता पक्ष हा आज देशातील मतदारांची पहिली पसंती ठरत आहे. बिहारमध्ये २० वर्षांनंतरही भाजपला विक्रमी मते, मुंबई महापालिकेत पहिल्यांदाच भाजपला मोठा जनादेश आणि केरळमधील तिरुवनंतपुरममध्ये भाजपचा पहिला महापौर बसला आहे. देशाचा मतदार आज गुड गव्हर्नन्स, विकास आणि वारशाचे जतन करणाऱ्या राजकारणाला पसंती देतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १८) आसाममधील कालियाबोर येथील सभेत केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, गेल्या दीड वर्षात देशाचा भाजपवरील विश्वास सातत्याने वाढत आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये जनतेने २० वर्षांनंतरही भाजपला विक्रमी संख्येने मतदान केले. दोन दिवसांपूर्वीच महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. पहिल्यांदाच जगातील सर्वात मोठ्या महापालिकांपैकी एक असलेल्या मुंबईतील लोकांनी भाजपला विक्रमी जनादेश दिला. महाराष्ट्रातील बहुतेक शहरांमधील लोकांनी भाजपला सेवा करण्याची संधी दिली आहे.

### काँग्रेसच्या निगेटिव्ह राजकारणाला देशाने नाकारले

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. काँग्रेसचे निगेटिव्ह पॉलिटिक्स देश नाकारत आहे. ज्या मुंबईत काँग्रेसचा जन्म झाला, तिथे आज ते चौथ्या-पाचव्या क्रमांकावर पोहचले आहेत', अशा शब्दांत पीएम मोदींनी टीका केली. या दौऱ्यात त्यांनी ६,९५७ कोटी रुपयांच्या काझीरंगा एलिव्हेटेड कॉरिडोरचे भूमिपूजन तसेच दोन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला.

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांशी साधला सुसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



(अधिक छायाचित्रे पान २ वर..)

पनवेल महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झालेल्या भाजप नगरसेवक-नगरसेविकांशी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. १८) सुसंवाद साधला आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

भाजप महायुतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये एकूण ७८पैकी भाजपच्या ५५ जागांसह महायुतीने ५९ जागी विजय मिळवला. या विजयात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचाही मोलाचा वाटा आहे. त्यांनी स्वतः निवडणूक न लढण्याची घोषणा आधीच केली होती. कार्यकर्त्यांनी आग्रह करूनदेखील त्यांनी नम्रपणे नकार दिला, पण प्रचारात झोकून देत भाजप महायुतीच्या विजयासाठी सक्रिय योगदान दिले. रॅलीत सहभागी होऊन त्यांनी मतदारांच्या घरोघरी जात गाठीभेटी घेतल्या आणि महायुतीच्या विजयाचे आवाहन केले. सुज्ञ मतदारांनीही विकासालाच आपला कौल दिला.




पनवेल महापालिकेच्या यंदाच्या निवडणुकीत जुन्या-जाणत्या नगरसेवकांसोबतच काही नवीन चेहरे निवडून आले आहेत. त्यांच्याशी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी कामोठे येथील आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व भाजप मध्यवर्ती कार्यालयात संवाद साधला. या वेळी त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विशेषतः नव्या नगरसेवक-नगरसेविकांना त्यांनी आगामी कारर्किदीसाठी सकारात्मक संदेश दिला. याबद्दल सर्वांनी त्यांचे आभार मानले.

# करंजाडेतील भुयारी मार्गाचे काम पूर्ण

## वाहतुकीसाठी लवकरच होणार खुला; वाहनचालक, प्रवाशांना मिळणार दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल-जेएनपीटी रेल्वे मार्गावरील करंजाडे येथील भुयारी मार्गाचे काम अखेर पूर्णत्वास आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तांत्रिक अडचणींमुळे रखडलेल्या या कामाला आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली वेग मिळाला असून लवकरच हा मार्ग वाहतुकीसाठी खुला होणार असल्याची माहिती करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांनी रविवारी (दि. १८) दिली.

करंजाडे परिसराचा झालेला विस्तार, जवळच असलेले महात्मा फुले महाविद्यालय आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन यामुळे या परिसरातील लोकवस्ती झपाट्याने वाढली आहे. पनवेल-जेएनपीटी रेल्वे मार्गावरून मोठ्या प्रमाणात मालवाहतूक होत असल्याने येथील रेल्वे फाटक वारंवार बंद असते. परिणामी वाहनचालकांना ताटकळत उभे राहावे लागत होते, ज्यामुळे वेळ आणि इंधनाचा मोठा अपव्यय होत होता.

रेल्वेने या ठिकाणी भुयारी मार्गाचे काम हाती घेतले होते, मात्र तांत्रिक समस्यांमुळे हे काम गेल्या काही वर्षांपासून रखडले. नागरिकांची ही गैरसोय दूर करण्यासाठी सरपंच मंगेश शेलार यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर हे काम मार्गी लागले आहे.

या भुयारी मार्गाची सरपंच मंगेश शेलार यांनी पाहणी केली. लवकरच हा मार्ग सर्वसामान्य जनतेसाठी खुला केला जाईल. यामुळे करंजाडे आणि परिसरातील हजारो नागरिकांचा प्रवासाचा वेळ वाचणार असून फाटकाच्या जाचातून त्यांची कायमची सुटका होणार आहे.

या पाहणीवेळी नाथाभाई भारवाड, प्रथमेश पुंडे, बाबासाहेब भोसले, रामचंद्र महाडिक, सुदर्शन कवडे, ज्योती तातरे, सुषमा मयेकर, संतोष विखारे, सुनील भोईर, कैलास शेलार, कांता गायकवाड, रश्मी शुक्ला, जयवंत भुजबळ, दिलीप गुंड, विवेक भोसले, अमोल मेने आदी उपस्थित होते.

# पनवेलमधील पाच भाविकांचा सोलापुरात कार अपघातात मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**



पनवेलहून अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांची कार झाडाला धडकून पाच जणांचा मृत्यू, तर एक महिला जखमी झाली आहे. पुणे-सोलापूर महामार्गावर मोहोळजवळ देवडी पाटी येथे शनिवारी (दि. १७) रात्री साडेअकराच्या सुमारास हा भीषण अपघात झाला.

अपघातग्रस्त कारमध्ये (एमएच ४६ झेड ४५३६) एकूण सहा प्रवासी (तीन पुरुष व तीन महिला) होते. अपघातात माला रवी साळवे (वय ४०, रा. पंचशील नगर झोपडपट्टी, नवीन पनवेल), अर्चना तुकाराम भंडारे (वय ४७, खांदा कॉलनी सेक्टर ७), विशाल नरेंद्र भोसले (वय ४१, रेल्वे कॉलनी, पनवेल स्टेशन), अमर पाटील (खारघर) आणि आनंद माळी यांचा जागीच मृत्यू झाला. ज्योती जयदास टाकले जखमी झाल्या असून त्यांना मोहोळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघात इतका भीषण होता की, कार रस्त्यापासून अंदाजे १० ते १५ फूट अंतरावर झुडपांमध्ये अडकली होती. जेसीबीच्या साहाय्याने कारचे दरवाजे तोडून मृतदेह बाहेर काढण्यात आले. सर्व मृतदेह मोहोळ येथील रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आले.

# नवी मुंबई महानगरपालिकेला राजधानी दिल्लीत राष्ट्रीय पुरस्कार

## मालमत्ता कर सुधारणा व डिजिटल प्रशासनाचा गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

मालमत्ता कर व्यवस्थेमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने राबविलेल्या व्यापक सुधारणा व नागरिक-केंद्रित डिजिटल प्रशासन उपक्रमासाठी देशातील प्रतिष्ठेचा 'स्कॉच पुरस्कार २०२५' नवी दिल्ली येथे १०४ व्या स्कॉच शिखर परिषदेत महानगरपालिकेला प्रदान करण्यात आला. महानगरपालिकेच्या वतीने हा पुरस्कार अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त डॉ. अमोल पालवे यांनी स्कॉच डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे अध्यक्ष समीर कोच्छर यांच्या हस्ते स्वीकारला.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा हा देशपातळीवर दखल घेत झालेला गौरव आहे. नवी मुंबई महानगरपालिकेला लाभलेला राष्ट्रीय प्रतिष्ठेचा 'स्कॉच पुरस्कार' हा नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. या माध्यमातून सुशासन, पारदर्शकता, तंत्रज्ञानाधारित करप्रणाली आणि उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन या निकषांवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या उल्लेखनीय कामाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने मालमत्ता कर सुधारणा उपक्रमाचा उल्लेख करावा लागेल, कारण हा प्रकल्प म्हणजे केवळ तांत्रिक बदल नसून नागरिकांचा विश्वास निर्माण करणारा आणि शहराच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मजबूत पाया आहे. त्यामुळे करभरणा करून शहर विकासात हातभार लावणा-या नागरिकांचे सर्वात मोठे योगदान आहे. मालमत्ता कर व्यवस्थेत आमुलाग्र व संरचनात्मक सुधारणा पूर्वीच्या हस्तलिखित, त्रुटीपूर्ण व अर्धवार्षिक कर आकारणी प्रणालीऐवजी पूर्णतः नव्याने सूत्रबध्द व सुनियोजित रचना केलेली मालमत्ता कर प्रणाली अंमलात आणली. या प्रणालीअंतर्गत एकच निश्चित वार्षिक करबिल, शासकीय दरांवर आधारित स्वयंचलित करआकारणी, पारदर्शक व न्याय्य मूल्यांकन, नागरिकांना समजेल अशी सोपी कररचना यांची अंमलबजावणी करण्यात आली. नागरिकांचा सहभाग केंद्रस्थानी ठेवून राबवलेली डिजिटल प्रणाली मालमत्ता कर प्रणालीतील सुधारणांमध्ये सर्वसमावेशकतेला विशेष प्राधान्य देण्यात आले. नागरिकांसाठी एकाच वेळी ऑफलाईन व ऑनलाईन विविध माध्यमांतून कर भरण्याची सुविधा, क्यूआर कोडद्वारे सुलभ कर भरणा सुविधा देण्यात आली. महानगरपालिकेची वेबसाईट, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड तसेच जीपे, फोनपे, पेटीएम अशा सर्व युपीआय सुविधा आणि व्हॉट्स प चॅटबॉट अशा विविध प्रकारच्या करभरणा सेवा, जनजागृती मोहिमा व माहिती - आधारित थकबाकी वसूली मोहिम राबविण्यात आली. त्यामुळे कर भरण्याबाबत नागरिकांचा विश्वास वाढून स्वयंस्फूर्त सहभाग लक्षणीयरित्या वाढला. भौगोलिक नोंदणी व माहिती शुद्धीकरणामुळे अचूकता मालमत्तांची अचूक ओळख सुनिश्चित करण्यासाठी मालमत्तांचे भौगोलिक स्थान नोंदविणे, पत्त्यांची पडताळणी व अद्ययावत नोंद, संपर्क क्रमांकांची खात्री, उच्च करक्षमतेच्या मालमत्तांवर लक्ष केंद्रित कारवाई करण्यात आली. यामुळे करआकारणी व संकलनात अचूकता आणि पारदर्शकता वाढली. कर संकलनात ऐतिहासिक वाढ मालमत्ता कर सुधारणा उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एकूण ४७८.३५ कोटींचे मालमत्ता कर संकलन नोंदविण्यात आले आहे. यामध्ये १ लाख ५९ हजार ४२५ मालमत्तांकडून कर भरणा, चालू कर संकलन ४२७.२० कोटी, थकबाकी कर संकलन ५१.१५ कोटी, ऑनलाइन कर भरण्यात सुमारे चारपट वाढ, अशी उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली आहे.

# नेरळ रेल्वेस्थानक परिसरातील महापुराची धोका होणार कमी

**कर्जत : प्रतिनिधी**



माणगाव टेकडीपासून वाहणारे पाणी रेल्वे मार्गाखालून जाण्यासाठी असलेले साकव पुलाची रुंदी कमी असल्याने नेरळ गावातील पाडा परिसरात मोठ्या प्रमाणावर पावसाळ्यात पूर सदृश परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे रेल्वेकडून रेल्वे मार्गिकेच्या खाली असलेल्या साकव पुलाची रुंदी वाढवण्यात यावी अशी मागणी नेरळ ग्रामस्थ २०१८ पासून करीत होते. पावसाळयात नेरळ गावात शिरणाऱ्या पाण्याचा याचा बंदोबस्त करण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडून साकव पुलाची पाणी वाहून जाण्याची क्षमता वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नेरळ गावातील पाडा, मातोश्री नगर भागात पावसाळ्यात महापुराची भीती कमी होण्याची शक्यता आहे.

मुबंई पुणे मार्गांवर नेरळ रेल्वे स्टेशनवरून कर्जतकडे जातांना किमी ८६ / ० ते ८७ / ० मध्ये असलेल्या पूल क्रमांक ८६ / ५ आहे. त्या पुलाखालून पाणी वाहून जाण्यासाठी असलेली रुंदी कमी असल्याने तेथून पाणी वेगाने पुढे वाहते. त्याचा परिणाम पावसाळ्यात सतत पाऊस सुरु असल्यास मोठ्या प्रमाणात पाणी त्या साकव पूलमध्ये अडकते आणि ते पाणी आजूबाजुंच्या लोकवस्तीत शिरते. त्यामुळे पाडा आणि मातोश्रीनागर मधील रहिवाहसनाच्या घरात पाणी शिरत असते ही बाब लक्षात घेऊन स्थानिक ग्रामस्थ सूर्यकांत चंचे यांच्याकडून मध्य रेल्वे प्रशासनकडे पाठपुरावा करण्यात येत होता. तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे आणि नेरळ ग्रामपंचायतीकडे तसेच मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु होता.

खासदार बारणे यांनी नेरळ स्थानकात बैठक घेतली त्यावेळी सूर्यकांत चंचे यांनी त्या साकव पुलांची रुंदी वाढवण्यात यावी. अशी मागणी केली होती. २०२५ मध्ये रेल्वे अधिकारी यांनी स्थानिक ग्रामस्थ तसेच नेरळ ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्या समवेत पाहणी झाली होती.

त्यानंतर आता पाडा भागातील त्या साकव पुलाचे रुंदी वाढवण्याचे काम सुरु असून २१ मीटर लांबीचा साकव पूल बांधण्यात येत आहे. त्याचा परिणाम पाडा आणि मातोश्रीनागर मध्ये पावसाळयात महापूरचे पाणी लोकवस्तीत शिरण्याचे प्रमाण कमी होऊ शकते.

## आयुक्त डॉ. शिंदेंची मुंबई मॅरेथॉनमध्ये धाव

**नवी मुंबई :** धावणे हा सर्वोत्तम व्यायाम असल्याचे मनोमन जाणून आपली धावण्याची आवड ध्यासात परिवर्तन करणारे आणि आपल्या अत्यंत व्यस्त दिनक्रमातूनही पहाटे लवकर धावण्याचा नियमित सराव करणारे नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आज मुंबईत झालेली अत्यंत प्रतिष्ठेची टाटा मुंबई मॅरेथॉन अकराव्यांदा सहभागी होत ४२ किलोमीटरचे अंतर ४



तास ३९ मिनिटे २३ सेकंदात पूर्ण केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील धावपटूंचा सहभाग असणाऱ्या या मुंबई मॅरेथॉन मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

गतवर्षी आयुक्तांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या जागतिक स्तरावरील मानाच्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सहभागी होत ८६.६ किलोमीटर अंतर ११ तास १० मिनिटे ५६ सेकंदात पूर्ण केले होते. या जागतिक मॅरेथॉनमध्ये सहभागी होणारे ते एकमेव सनदी अधिकारी आहेत.

# रोहा पालिका निवडणुकीनंतर सत्ताधारी ॲक्शन मोडवर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद निवडणुका पार पडल्यानंतर निवडून आलेल्या सत्ताधाऱ्यांनी रोह्यात स्वच्छ रोहा सुंदर रोहा यासाठी पुढाकार घेतला असून या निमित्ताने रोहा अष्टमी नगरपरिषद क्शन मोडवर आल्याचे दिसून येते आहे. शुक्रवारी रोहा शहरातील अतिक्रमण विविध समस्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे या प्रत्यक्ष पाहणी करत



नगरपरिषदचे अधिकारी अंमलबजावणी करताना दिसून येत होते.यावेळी नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, रवींद्र चाळके, अरबाज मणेर, माज सवाल, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, नगरपरिषद अधिकारी मनोज पुळेकर आदी उपस्थित होते.

रोहा अष्टमी शहरात नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी त्यांच्या सर्व सहकारी, मुख्याधिकारी अजय कुमार एडके यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा अष्टमी नगर परिषद चे अधिकारी कर्मचारी क्शन मोडवर आल्याचे दिसून येत आहे. रोह्यात मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा येत असलेल्या हातगाडी हटविण्यात येत असून रस्त्यावर यापुढे हातगाडी दिसल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

रोहा शहरात प्लास्टिक बंदी साठी जनजागृती करण्यात येत असून यापुढे प्लास्टिक पिशव्या आढळल्यास कडक कारवाई करण्याच्या सुचना ही देण्यात आले आहेत.

# हुतात्मा हिराजी पाटील यांची आज ११२वी जयंती

**कर्जत : विजय मांडे**

१९४२मध्ये ब्रिटिशांविरुद्ध चलेजाव आंदोलनात सक्रिय झालेल्या कर्जत तालुक्यातील मानिवली गावातील २८ वर्षीय तरुणाची ब्रिटिशांनी गोळ्या घालून हत्या केली होती. या तरुणाची जन्मतारीख कोणालाही आजपर्यंत माहिती नव्हती. मात्र इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी अनेक वर्षाच्या प्रयत्नांना यश आले असून १९ जानेवारी १९१४ रोजी हिराजी यांचा जन्म झाल्याचे सरकारी दाखले प्राप्त झाले आहेत. हुतात्मा हिराजी पाटील यांची ११२वी जयंती आज साजरी होत आहे.



कर्जत मानिवली गावातील गोमाजी पाटील यांनी भाई कोतवाल यांच्या आझाद दस्त्याच्या उडी घेतली. त्यांच्या आझाद दस्त्याने ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. ब्रिटिशांनी त्यावेळी आझाद दस्त्यातील क्रांतिकारकांची माहिती देण्यासाठी रोख रकमेची बक्षिसे देखील लावली होती. असे असतांना ब्रिटिशाना कोणी सापडले नाही म्हणून गोमाजी पाटील यांचे सुपुत्र हिराजी यांना ब्रिटिश पोलिसांनी मानिवली गावातून पकडून कल्याण येथे नेण्यासाठी नेरळ स्टेशनवर आणले, मात्र देशप्रेमाने झपाटलेल्या हिराजी यांनी नेरळ स्टेशन वर शौचास जायचे कारण सांगून शौचालयात गेले आणि शौचालयाच्या याच्या खिडकीतून पळ काढून आझाद दस्त्याच्या मुक्कामी रात्रीचा प्रवास करून पोहचले. उणेपुरे २८ वर्षाचे वयोमान असलेल्या हिराजी यांचा संसार अर्धवट ठेवून देशहितासाठी पोहचले होते. तिकडे फितुरीने आझाद दस्त्याचा घात झाला आणि मुरबाड जवळील सिद्धगड येथे ब्रिटिशांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात आधी हिराजी गोमाजी पाटील आणि नंतर या दस्त्याच्या प्रमुख विठ्ठलराव तथा भाई कोतवाल यांना वीरमरण आले.

अशा या देशप्रेमी तरुणाची बलिदान गेली ६० हुन अधिक वर्षे २ जानेवारी रोजी साजरा केला जातो.मात्र स्मृतीदिन साजरा होत असलेल्या या भारतमातेच्या थोर सुपुत्राचा जन्म कधी झाला याची माहिती कोणाकडे नव्हती. त्यामुळे हुतात्मा भाई कोतवाल यांच्याप्रमाणे हुतात्मा हिराजी पाटील यांची जयंती साजरी होत नव्हती. हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या जन्मदिवसाची तारीख उपलब्ध नसल्याने देशप्रेमी नागरिकांची आणि मानिवली ग्रामस्थांची इच्छा असून देखील जयंती साजरी करता येत नव्हती. त्यात सुरुवातीच्या काळात हुतात्मा हिराजी पाटील यांचे साधे फोटो चित्रदेखील कोणाकडे उपलब्ध नव्हते आणि त्यामुळे हिराजी पाटील यांचा इतिहास काळाच्या पडद्याआड होता. ठाणे जिल्हा परिषदेत बांधकाम विभागात अभियंता पदावर काम करणारे वसंत कोळंबे यांना सिद्धगडावर घडलेला इतिहास यांची माहिती ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या दस्तावेज यावरून लक्षात आली होती.त्यामुळे त्यांनी कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक रामदास गायकर या चित्रकार असलेल्या शिक्षकाच्या माध्यमातून हुतात्मा हिराजी पाटील यांचे तैलचित्र तयार केले गेले. त्यावेळी वसंत कोळंबे यांच्या मनात हुतात्मा हिराजी पाटील यांचा जन्म कधी झाला याची माहिती नव्हती. त्यामुळे या दोन्ही हुतात्म्यांचा इतिहास शोधण्यासाठी अनेक वर्षे खर्ची घालणारे वसंत कोळंबे यांनी हिराजी गोमाजी पाटील यांची जन्मतारीख शोधण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न केले. हिराजी पाटील हुतात्मा झाले तेंव्हा त्यांचे वय ठामपणे कोणी सांगू शकत नव्हता. मात्र हिराजी यांचे मामा जे बिरदोले गावाचे होते. त्यांनी आपल्या बहिणीने आधी मुलीला जन्म दिला होता आणि गोमाजी पाटील यांचे दुसरे अपत्य हे हिराजी हा मुलगा होता हि माहिती पुढे आली होती. त्याआधारे वसंत कोळंबे यांनी कर्जत तहसील कार्यालयात येरझऱ्या मारल्या.

यात कोळंबे यांच्या प्रयत्न फळास आले त्यावेळी मोडी भाषेत लिहिलेला मजकूर पुढे आला. १९४३ ला देशासाठी बलिदान दिले त्यावेळी हिराजी पाटील हे २५ ते ३० वर्षे वयाचे होते,त्यानुसार अनुमान लावून गोळा झालेली माहिती वाचण्याचा प्रयत्न झाला पण त्यावेळी हाती आलेली माहिती ही मोडी लिपीतील असल्याने मोडी भाषा कोणी वाचायची हा प्रश्न निर्माण झाला, मात्र कर्जत येथे मोडी लिपी वाचणारे एक गृहस्थ असल्याची माहिती मिळताच त्यांना घेऊन वसंत कोळंबे तहसील कार्यालयात पोहचले. कर्जत तहसील कार्यालयाच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी वसंत कोळंबे यांची यामागची मेहनत लक्षात घेऊन कागपत्रे माहिती साठी समोर ठेवली आणि हिराजी पाटील यांच्या जन्म तारखेचा उलगडा झाला.

## कर्जतच्या संशोधनाने देशाच्या अन्न व पोषण सुरक्षेला बळकटी मिळेल : वर्षा लड्डा-उंटवाल

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या गरजेनुरूप संशोधन कार्य सुरू असल्याने देशाच्या अन्न व पोषण सुरक्षेला बळकटी मिळेल,असे प्रशंसोद्गार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेच्या महासंचालक वर्षा लड्डा-उंटवाल (भा.प्र.से.) यांनी काढले. येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात कृषी समृद्धी योजनेंतर्गत विविध पिकातील जलद पैदास संरचना उभारण्या संदर्भात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत महाराष्ट्रातील शास्त्रज्ञांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.



यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे संशोधन संचालक डॉ. किशोर शिंदे ,प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ.भरत वाघमोडे,डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कृषी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना थोरात,प्राध्यापक डॉ. प्रीती सोनकांबळे, जैवतंत्रज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रवीण जाधव,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय अमोलिक,कृषी संशोधन केंद्र, बदनापूर चे प्रभारी अधिकारी डॉ. दीपक पाटील,शास्त्रज्ञ डॉ. विष्णू गीते,विभागीय संशोधन केंद्र, सिंदेवाहीचे वरिष्ठ पैदासकार डॉ. गौतम श्यामकुवर व डॉ.मदन वांढरे,कापूस संशोधन केंद्र, नांदेडचे सहयोगी प्राध्यापक डॉ. विजयकुमार चिंचणे, कृषी संशोधन केंद्र कर्जतचे प्रमुख कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर व अन्य शास्त्रज्ञ उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या की,शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मनुष्यबळाचा तुटवडा असूनही शास्त्रज्ञ करीत असलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे असल्याने महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून त्यांच्या बळकटीकरणासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. राज्याच्या कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत येथील गतिमान भात पैदास प्रकल्पाप्रमाणे महाराष्ट्रातील राहुरी, अकोला व परभणी येथील कृषी विद्यापीठांतही विविध पिकातील जलद पैदास संरचना प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सूतोवाच त्यांनी केले.

यावेळी डॉ. भरत वाघमोडे यांनी प्रास्ताविकासह केंद्रातील गतिमान पैदास तसेच विविध प्रयोगांचे सादरीकरण केले. संयुक्त राष्टसंघाने सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय शेतकरी महिला वर्ष घोषित केल्याने व महासंचालक पदावर विराजमान असलेल्या वर्षा लड्डा उंटवाल यांची पहिलीच कर्जत भेट होती

**पान १ वरुन**

## सुकापूरमध्ये लाडकी बहीण मेळावा

भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांच्यासह सुकापूरमधील भाजपच्या लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच या भागातील रस्ते, पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेचे अनेक प्रश्न मार्गी लागले असून परिसरात सातत्याने होणारी भूमिपूजने आणि उद्घाटने हेच येथील खऱ्या विकासाचे पुरावे आहेत, असेही त्यांनी नमूद केले. या मेळाव्याला सुकापूर परिसरातील महिलांसह नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

## ४७ हजारांची चोरी

**नवीन पनवेल :** दोन बहुरूपी इस्मानी २८ वर्षीय तरुणाकडील ४७ हजार रुपये चोरल्या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात १६ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अरविंद धोत्रे हा देवदगाव येथे राहत असून तो १६ जानेवारी रोजी मतमोजणी कार्यालयापासून १०० मीटर अंतरावर पनवेल महानगरपालिका नवीन इमारत, छोटा खांदा गाव रस्ता, काळसेकर कॉलेजच्या बाजूला, पनवेल या ठिकाणी मांडवात बसला होता. त्यावेळी एका इसमाने त्याच्या खिशात हात घातला आणि पैसे काढत असल्याचे त्याच्या लक्षात आले.

त्या महिलेस पकडले असता त्यांनी त्याच्याकडील पैसे दुसऱ्या महिलेला दिल्याचे दिसले. या महिलांना पकडून कामोठे पोलिसांचे ताब्यात देण्यात आले. या महिला बहिरूपी असल्याचे पोलिसांनी चौकशी केल्यावर लक्षात आले. संजय मुळे आणि सुनील मुळे राहणार सेक्टर ९, कळंबोली, अशी दोघांची नावे आहेत.

### सिमेंट बलकरची मोटर सायकलला धडक, एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** सिमेंट बलकरने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत ६६ वर्षीय अशोकन मादा पाटील यांचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी सिमेंट बलकर १६ जानेवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास अशोकन पाटील हे त्यांची मोटरसायकल घेऊन जात होते. यावेळी उत्सव सर्कल, खारघर या ठिकाणाहून सिमेंट बलकरने भरधाव वेगाने येऊन त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली आणि त्यात अशोकन यांचा मृत्यू झाला.

# पेणमध्ये आदिवासी मुलांसाठी प्रेरणा कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

शिक्षण हे जीवन उन्नत करणारे महत्त्वाचे साधन आहे. शालेय जीवनात शिक्षण घेताना भविष्याची स्वप्ने पाहत उज्ज्वल भविष्यासाठी अंधश्रद्धेला तिलांजली, कुमारी माता बालविवाह या समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरांना मूठमाती देऊन शिक्षणाने समृद्ध व्हा. प्रगतीच्या वाटा निवडा, असे आवाहन रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले. पेण वाक्रुळ पानेड येथील आदिवासी प्रकल्प विभाग आणि पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत आंचल



दलाल बोलत होत्या.

पेण आदिवासी प्रकल्प विभाग अंतर्गत वरसई सावरसई वरवणे आदिवासी आश्रम शाळेतील दोन हजार विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी हितगुज संभाषण केले. मुलींनी अत्याचार, बालविवाह, अंधश्रद्धा, भगतगिरी याबाबत माहिती मिळाल्यास ११२ नंबर डायल करून पोलिस यंत्रणेशी संपर्क करण्याचे आवाहनही यावेळी दलाल यांनी केले.

प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विद्येविना मती गेली या श्लोकातून प्रारंभ करताना शिक्षण हे सर्वांगीण सुधारणा करण्याचा मानवी जीवनात प्रगतीचा मार्ग असल्याचे सांगितले. तर डीवायएसपी जालंदर नालकुल यांनी प्रेरणा या कार्यशाळेचा उपक्रम प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमासाठी आदिवासी प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, उपविभागीय पोलिस अधिकारी जालंदर नालकुल, पेण पोलिस निरीक्षक संदीप बागूल, वडखळ पोलिस निरीक्षक संतोष जाधव, दादर सागरी ठाणे पोलिस निरीक्षक संजयकुमार बामणे भरोसा सेल अलिबाग पोलिस निरीक्षक सरिता चव्हाण, आदिवासी सरपंच सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थी उपस्थित होते.

# परदेशी नागरिकांचे बेकायदेशीररित्या वास्तव्य; चार घरमालकांविरुध्द गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात सुरु करण्यात आलेल्या विशेष मोहिमेत गुन्हे शाखेकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने नुकतीच तळोजा आणि खारघर परिसरात छापे टाकून परदेशी नागरिकांना सी-फॉर्म न भरता बेकायदेशीरपणे घरे भाड्याने देणाऱ्या ४ घरमालकांवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच बेकायदेशीर असलेल्या आफ्रिकन (नायजेरियन) नागरिकांना ताब्यात घेतले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात विशेष मोहिम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान नुकतेच अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या नेतृत्वाखाली आफ्रिकन नागरिक राहत असलेल्या कोपरखैरणे, वाशी, खारघर आणि तळोजा परिसरात छापे टाकण्यात आले.

या कारवाईत खारघर तळोजा परिसरातील ४ घरमालकांनी परदेशी नागरिकांना सी-फॉर्म न भरता बेकायदेशीररित्या आपल्या घरामध्ये भाडोत्री म्हणून ठेवल्याचे आढळून आले. तळोजा येथील पार्वती हाईटस्, रूम नं. ५०१ येथे परदेशी नागरिकांना बेकायदेशीरपणे राहण्यास मदत केल्याप्रकरणी घरमालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच खारघर येथील ड्रिम सफायर इमारतीमधील फ्लॅट क्रमांक ४०१ आणि ४०२ तसेच सेक्टर-३०, ओवे गाव येथील गॉडगिफ्ट को-ऑप. हौसिंग सोसायटीतील फ्लॅट क्रमांक ३०४ येथे परदेशी नागरिकांना बेकायदेशीररित्या घरे भाड्याने दिल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या सर्व घरमालकांविरोधात तळोजा आणि खारघर पोलीस ठाण्यात परदेशी नागरिक कायदा १९४६ कलम १४ (क) आणि रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९ कलम ५ अन्वये ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या आफ्रिकन नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, परदेशी नागरिकांना भाड्याने घर देताना सी-फॉर्म भरणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.भविष्यातही अशीच मोहीम सातत्याने सुरु राहणार असल्याचा इशारा दिला आहे.













पनवेल : महानगरपालिकेच्या निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष महायुतीने घवघवीत यश संपादन करत आपला गड राखला आहे. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विविध स्तरांतून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पक्षाचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ अर्पण करत या विजयाचा आनंद साजरा केला. या विजयाप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवनिर्वाचित नगरसेवक एकनाथ गायकवाड, दशरथ म्हात्रे आणि विजय खानावकर यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मोतीलाल कोळी, संजय पाटील, सुरेश म्हात्रे, भीमराव पोवार, आनंद पाटील, दिलीप कोरडे, मंगेश कुलकर्णी, अहिरे साहेब, भूषण गायकवाड यांच्यासह आनंदी ग्रुपचे सदस्य आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## ८० वर्षीय व्यक्तीची तब्बल चार कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हेगारांनी खारघर येथील एका नामवंत शैक्षणिक संस्थेतील ८० वर्षीय निवृत्त डायरेक्टरला अटक करण्याची भीती दाखवत तब्बल ४ कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

हे निवृत्त संचालक खारघर सेक्टर-१२ मध्ये वास्तव्यास असून ते राजस्थान, जयपूर येथील एका नामांकित इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिटट्यूटमधून डायरेक्टर पदावरून निवृत्त झाले आहेत.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'सायबर डेटा प्रोटेक्शन ऑफ इंडिया'मधील अधिकारी असल्याचे सांगत एका सायबर गुन्हेगाराने त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला.

तसेच त्यांच्या आधारकार्डचा गैरवापर करून बनावट सिमकार्ड घेतले असून त्यावरून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याचे व त्याबाबत त्यांच्यावर नाशिक येथे गुन्हा दाखल झाल्याची सांगून त्यांना घाबरवले.

यानंतर स्वतःला नाशिक पोलीस, क्राइम ब्रँच, एनआयए अधिकारी असल्याचे भासवत वेगवेगळया गुन्हेगारांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना अटकेची भीती घातली. त्यानंतर पी. आय. संदीप राव, प्रदीप जैस्वाल आणि थेट आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे-पाटील असल्याचे भासवून सायबर गुन्हेगारांनी व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉलद्वारे या डायरेक्टला संपर्क साधत त्यांची केस नॅशनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंटमध्ये असल्याचे व त्यांच्या नावावर वॉरंट निघाला आहे. अशा प्रकारच्या विविध भीती दाखवून त्यांना घाबरवले. तसेच याबाबत कुणाशी चर्चा करू नये, अशी सक्त ताकीद दिली.

त्यानंतर सायबर गुन्हेगारांनी आरबीआयने उघडलेल्या विशेष खात्यात सर्व पैसे जमा करण्यास सांगितले. त्यावर निवृत्त डायरेक्टरने नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या बँक खात्यांवर तब्बल ४ कोटी ३८ लाख रुपये ट्रान्सफर केले. त्यानंतर त्यांनी इतर नागरिकांकडून फसवणूक केलेली १ कोटी २ लाख रुपयांची रक्कम २४ व २५ नोव्हेंबर रोजी या वृद्धाच्या खात्यात जमा करून ती इतर खात्यांत ट्रान्सफर करायला लावून त्याचा वापर केला. याप्रकरणी नागपूर सायबर पोलिसांनी डिसेंबरमध्ये या डायरेक्टरचे बँक खाते फ्रीज केल्याचे त्यांना भासवण्यात आले. त्यानंतर या वृद्धाने नागपूर सायबर पोलिसांशी संपर्क साधला असता हा प्रकार सायबर फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले. त्यावर त्यांनी १० जानेवारी रोजी त्यांनी एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार दाखल केली.

## ज्येष्ठ नागरिकाचा अपघाती मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील उत्सव सर्कलजवळ भरधाव सिमेंट काँक्रिट बल्करने मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील व्यक्ती सिमेंट बल्करच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या सिमेंट बल्कर चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे.

या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव अशोक मादापाटील (६६) असे असून ते खारघर, सेक्टर-१२ मधील सनसफल सोसायटीत कुटुंबासह राहत होते. अशोक मादापाटील कामानिमत्त आपल्या मोटारसायकलवरुन सेंट्रल पार्क कडून खारघर हायवेकडे जात होते. यावेळी उत्सव चौकातील वळणावर सिमेंट बल्कर वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यामुळे ते मोटारसायकलसह सिमेंट बल्करखाली आले. या अपघातात अशोक मादापाटील गंभीर जखमी झाल्याने त्यांचा काही वेळातच मृत्यू झाला.

## पनवेलमध्ये भातखरेदीला प्रतिसाद

**पनवेल :** पनवेल तालुक्यात आधारभूत धान खरेदी योजना २०२५२६ अंतर्गत धान खरेदीला वेग आला आहे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व जिल्हा पणन अधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसाधारण धानासाठी प्रति क्विंटल २,३६९ रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यातील शेतकरी ऑनलाईन नोंदणी करून आपला भात पनवेल तालुका सहकारी भात गिरणी लिमिटेड येथे विक्रीसाठी आणत आहेत. दर समाधानकारक असल्याने शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गिरणी परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. शासनाच्या हमीभाव खरेदीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून धान खरेदी प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.



पनवेल : येथील पंचायत समितीच्या माजी सदस्य तथा भाजप महिला मोर्चा माजी तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांना वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नेत्या शकुंतला ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेविका दर्शना भोईर व सहकारी.

## पोलीस असल्याचे सांगून १३ लाख रुपये चोरले

**नवीन पनवेल :** पोलीस असल्याचे भासवुन पाच ते सहा जणांनी डॉक्टरांकडील १३ लाख २५ हजार रुपये लुटून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ. मनीष शिंदे हे सांगली येथे राहत असून ते साखर खरेदी विक्रीचा व्यापार करतात. कॅनरा बँक समोरील रस्त्यावर सेक्टर २० खारघर येथे रस्त्यावरून चालत जात होते यावेळी सफेद रंगाची एर्टिगा गाडीतून पोलिसांप्रमाणे हातात काठी असलेले आणि गाडीमध्ये पोलीस कॅप असलेले अनोळखी पाच ते सहा उतरले आणि त्यांनी डॉक्टराला पोलीस असल्याचे भासवले आणि हातातील १३ लाख २५ हजार रुपये असलेले पिशवी ते घेऊन गेले.



## वीर वाजेकर महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन बेसिक कोर्स

**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन पाच दिवसीय बेसिक ट्रेनिंग कोर्स चे आयोजन केले होते . उद्घाटनास प्रमुख वक्ते श्री शशिकांत शिरसाट सहायक उप नियंत्रक, नागरी संरक्षण दल, उरण हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते.



त्यांनी उरण सारख्या औद्योगिक परिसरात आपत्तीला सामोरे जाण्यासाठी तरुण पिढी प्रशिक्षित असणे अत्यन्त गरजेचे आहे व विद्यार्थ्यांनी ह्या कार्यशाळेचा उपयोग आपत्ती च्या प्रसंगी करून कमीत कमी जीवित हानी होईल असे प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

शशिकांत शिरसाट यांनी सदर बेसिक कोर्स मध्ये आपत्ती म्हणजे काय, आपत्तिचे प्रकार ह्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना करून आपत्ती च्या वेळेस जखमींना कसे प्रथमोपचार द्यायचे, त्यांच्या जखमेवर ड्रेसिंग कसे करायचे, त्यांना सुरक्षित ठिकाणी किंवा दवाखान्यात कसे न्यायचे, स्ट्रेचर नसल्यास घरगुती साहित्यातून स्ट्रेचर कसे बनवायचे व जखमींना घेऊन जायचे, जखमी व्यक्तीला कसे उचलायचे आग लागली असल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ची उपाययोजना, दोर व गाठी बद्दल माहिती आणि प्रात्यक्षिके नियंत्रण व संदेशवहन बाबत सखोल माहिती देण्यात आली.

ह्या सर्व प्रकारांची प्रात्यक्षिक दाखवून विध्यार्थ्यांकडून सराव करून घेतला गेला. तसेच पूर परिस्थिती मध्ये आपण आपले व दुसऱ्यांचे जीव घरघुती वस्तूंचा वापर करून कसे वाचवू शकतो ह्याची माहिती दिली . त्याच प्रमाणे आपत्तीच्या वेळेस जीव गुदमरला असेल किंवा व्यक्ती बेशुद्ध असेल किंवा हृदयाचा झटका आला असल्यास काय उपाय योजना करायची कसा प्रथमोपचार करायचा ह्याचीही सविस्तर माहीती प्रत्यक्षिकासहीत करून दिली.

## पनवेलमध्ये माघी गणेशोत्सवाची तयारी

**पनवेल : वार्ताहर**

अवघ्या काही दिवसात होणाऱ्या माघी गणेश जयंतीनिमित्त पनवेलच्या भिंगारी परिसरात विविध श्री गणेश कारखान्यांत गणेशमूर्ती साकारत आहेत.

मूर्तिकार आपल्या कौशल्याला आकार देत सुंदर आणि देखण्या मूर्ती घडवत आहेत. दीड दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी तयारी जोरात सुरू आहे. पनवेल शहरात माघी गणेश जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे भिंगारी मध्ये पालीच्या गणेश मूर्ती साकरण्यात येत आहे.



पनवेल : येथील महापालिका निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्याबद्दल स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी आमदार प्रशांत ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे अभिनंदन केले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन पाटील, स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## लाखोंची चोरी करणाऱ्या दोघांना काही तासांत अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोकरपाडा गावातील जुना मुंबई-पुणे हायवेवरील एलटीआर रियालिटी क्रिस्टोरिया इस्टेट ट्रेनिंग सेंटर येथे झालेल्या मोठ्या चोरीचा गुन्हा रसायनी पोलिसांनी अवघ्या काही तासांत उघडकीस आणला आहे. या प्रकरणी दोन सराईत चोरट्यांना अटक करून तब्बल ३ लाख १० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अज्ञात चोरट्यांनी कंपनीच्या बांधकाम साईटच्या वॉल कंपाऊंड व तारेच्या कुंपणातून प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी मोठ्या प्रमाणावर बांधकामासाठी लागणारे साहित्य चोरून नेले. या चोरीमध्ये २,३०,०००/- रुपये किमतीचे २३ लोखंडी 'माय वन' शीट आणि ८० हजार रुपये किमतीचे १७ॲल्युमिनियम पॅनल व सेंटरिंग लॉक असा ऐवज चोरट्यांनी लंपास केला होता. एकूण ३,१०,०००/- रुपयांचा मुद्देमाल ऐरोली, जि. ठाणे) यांनी रसायनी पोलीस या प्रकरणी प्रसन्ना शांताराम गडकर (रा. ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच रसायनी पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने अवघ्या काही तासांतच या चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नौशाद अहमद अब्दुल लतीफ कुरेशी (वय ४०, रा. धारावी, मुंबई) आणि योगेश लक्ष्मण भोंडगे (वय ३०, रा. हातनोली-चौक) यांचा समावेश आहे. या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयाने १९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांच्याविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संपादकीय

# विकास अन् स्थैर्याला कौल

महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीने राज्याच्या राजकीय भविष्याची दिशा स्पष्ट करणारा संदेश दिला आहे. या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मोठी बाजी मारत बहुतांश महापालिकांवर सत्ता मिळवली आहे. अनेक ठिकाणी भाजपचा महापौर विराजमान होणार असून मित्रपक्षांनीही लक्षणीय यश संपादन केले आहे. दुसरीकडे हा निकाल विरोधी पक्षांसाठी केवळ पराभव नसून आत्मचिंतनाची आणि पुनर्रचनेची गरज अधोरेखित करणारा ठरला आहे.

**महानगरपालिका निवडणूक केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक नसते, तर अशा निवडणुका जनतेच्या मनोवृत्तीचा आरसा मानल्या जातात. पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत नागरी प्रश्नांवर जनतेचा कौल या निवडणुकांतून व्यक्त होतो. या वेळी मतदारांनी विकास, प्रशासनातील स्थैर्य आणि निर्णयक्षम नेतृत्व यांना प्राधान्य दिल्याचे स्पष्ट दिसते. भाजप आणि महायुतीच्या यशामागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम, केंद्र व राज्य पातळीवर राबवण्यात आलेल्या विविध विकासकामांचा आणि योजनांचा थेट परिणाम शहरी मतदारांवर झाला. पायाभूत सुविधा, स्मार्ट सिटी प्रकल्प, डिजिटल सेवा, घरकुल योजना आणि नागरी सुविधा सुधारण्यावर भर देण्यात आल्याने सत्ताधारी पक्षांविषयी विश्वास निर्माण झाला. प्रचारादरम्यान या कामांचा ठळकपणे उल्लेख करण्यात आला आणि मतदारांपर्यंत तो प्रभावीपणे पोहचवण्यात यश आले. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे संघटनात्मक ताकद. भाजपने बूथ पातळीपासून ते शहर पातळीपर्यंत मजबूत यंत्रणा उभी केली आहे. कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग, उमेदवारांची निवड करताना स्थानिक समीकरणांचा विचार आणि प्रभावी प्रचारयोजना यामुळे पक्षाला लाभ झाला. मित्रपक्षांनीही आपापल्या प्रभावक्षेत्रात चांगली कामगिरी करत महायुतीची एकत्रित ताकद दाखवून दिली. या निकालांतून नेतृत्वाचा मुद्दाही अधोरेखित होतो. महायुतीने स्थिर आणि निर्णयक्षम नेतृत्वाचा संदेश मतदारांपर्यंत पोहचवला. विकासासाठी स्थैर्य हा मुद्दा शहरी मतदारांना भावला. याउलट विरोधकांकडे स्पष्ट दिशा, एकसंघ नेतृत्व आणि विश्वासार्ह पर्यायाचा अभाव जाणवला. अनेक शहरांमध्ये विरोधी पक्ष आपापसातील मतभेद, गटबाजी आणि उमेदवार निवडीतील संभ्रमामुळे कमकुवत ठरले. विरोधी पक्षांसाठी हा निकाल गंभीर इशारा देणारा आहे. केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करणे किंवा भावनिक मुद्द्यांवर निवडणूक लढवणे पुरेसे नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. शहरी मतदार अधिक जागरूक झाला असून तो कामगिरीच्या आधारावर मतदान करत आहे. स्थानिक प्रश्नांवर ठोस भूमिका, विश्वासार्ह विकास आराखडा आणि सक्षम नेतृत्व सादर करण्यात विरोधक अपयशी ठरल्याचे या निकालांतून दिसते तसेच विरोधकांनी संघटनात्मक पातळीवरही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. कार्यकर्त्यांशी संवादाचा अभाव, स्थानिक नेतृत्वाला डावलणे आणि केवळ वरून लादलेल्या निर्णयांमुळे तळागाळातील संपर्क तुटत चालल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले. याचा थेट फटका मतदानावर बसला. त्यामुळे भविष्यातील निवडणुकांसाठी विरोधकांनी नव्या रणनीतीचा विचार करणे अपरिहार्य ठरणार आहे. लोकशाहीत विजय आणि पराभव हे येत-जात असतात, मात्र जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी सातत्यपूर्ण कामगिरी आणि प्रामाणिक प्रयत्न हाच खरा मार्ग असल्याचे या निकालांनी अधोरेखित केले आहे.**

# आता लढाई जि.प., पं.स. निवडणुकीची

**खबरबात**
विजय मांडे

नुकत्याच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्या. तालुक्यात मुख्य लढत महायुती आणि परिवर्तन विकास आघाडीमध्ये होणार असली तरी कोण कुठल्या पक्षाचा उमेदवार असेल हे सांगता येत नाही. अगदी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम क्षणीदेखील काहीही घडू शकते.

काही म्हणा, परंतु या निवडणुकीत आयाराम गायारामांची चांगलीच चलती आहे. आपला उमेदवार निवडून येणार नाही म्हणून पक्ष सोडून अन्य उमेदवाराकडे आलेले पदाधिकारी व कार्यकर्ते अवघ्या चोवीस तासात माघारी फिरल्याची ताजी उदाहरणे आहेत. थोडक्यात राजकारण बदलल्याने प्रामाणिक कार्यकर्त्यांची कुचंबणा होऊ लागली आहे. त्यामुळे सर्वच पक्षांची ही कसोटीची वेळ आहे.

पूर्वीचे कार्यकर्ते एकनिष्ठ असायचे. त्या वेळी पैसे घेऊन मतदान करण्याची पद्धत नव्हती. पक्षाने एखादा उमेदवार जाहीर केला की, तन-मनाने तो कसा निवडून येईल यासाठी त्याचे कार्यकर्ते जीवाचे रान करीत असत. अगदी चाळीस वर्षांपूर्वीसुद्धा केवळ वडापाव खाऊन कार्यकर्त्यांनी आपले उमेदवार निवडून आणले आहेत. त्या काळी बैलगाडीने प्रवास करावा लागत असे आणि ज्या गावात मुक्काम असे त्या गावात एखादा जवळचा नातेवाईक म्हणजे बहिणीचा नवरा असला आणि तो जर विरोधी पक्षाचा असला की, त्याच्या घरी जाणे सोडा, तर त्याच्याकडे ढुंकून न बघणारे कार्यकर्ते होते. भावांबरोबरचे नाते तोडण्यातही ते मागे पुढे पाहत नव्हते. इतकी पक्षनिष्ठा त्यांच्या अंगी ठासून भरली होती. त्या वेळी पक्षाला मानणारे निष्ठावंत कार्यकर्ते असल्याने असे त्यांना वागावे लागत असे. आता निष्ठा सोडा कोणता कार्यकर्ता आज कोणत्या पक्षात आहे याचा अंदाज बांधत असताना तो कुठल्या तरी पक्षात गेलेला असतो. असे राजकारण सर्वच ठिकाणी सुरू आहे.

सुरुवातीला पायपीट करून निवडणुकीचा प्रचार होत असे. त्यानंतर बैलगाडी किंवा सायकलवरून प्रचार होत असे. कालांतराने जीप गाड्या प्रचारासाठी वापरण्यात येऊ लागल्या. त्या वेळचे रस्ते मातीचे असत. त्यामुळे प्रचारासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांचे कपडे खराब होत असत. पक्षासाठी नाती गोती विसरणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या खूप होती, तर काही कार्यकर्ते निवडणुकीपुरती नातीगोती दूर ठेवत असत. आता भावाच्या विरुद्ध सख्खा भाऊ निवडणूक लढविण्यास तयार असतो. याचे एकमेव कारण म्हणजे माझ्यापेक्षा कुणी मोठा नाही. ही ईर्षा मनामध्ये असते. त्यामुळे 'भाऊबंदकी' तुटलेली अनेक उदाहरणे आहेत. हल्ली एकच घरात अनेक पक्षात भाऊ-भाऊ आहेत म्हणजे सोयीचे राजकारण सुरू आहे.

पूर्वी एखाद्या मोठ्या निवडणुकीची प्रचारसभा शहराच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी असली की कार्यकर्ते स्वखर्चाने बैलगाडीने किंवा मैल न मैल चालत येत असत. मध्यंतरी त्यामध्ये बदल झाला आणि ट्रकने माणसे सभांसाठी आणण्यात येत होती. आता तर रोजंदारीने माणसे आणली जातात आणि तीसुद्धा लक्झरी बस किंवा कारने आणावी लागतात. दिवसेंदिवस त्यामध्येही बदल होऊन वातानुकूलित बस किंवा वातानुकूलित कारची अपेक्षा कार्यकर्त्यांना असते. हे बदल या गेल्या पाच-दहा वर्षात झाले आहेत. आघाड्यांची बिघाडी कधी होईल ते सांगता येत नाही. या निवडणुकीत एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेला उमेदवार पुढच्या निवडणुकीत त्याच पक्षात असेल याची शाश्वती देता येत नाही, तर कार्यकर्त्यांची भूमिका कुणी सांगावी कशी असेल ते? टी.एन. शेषन यांनी आचारसंहितेचे अंमलबजावणी सुरू केली आणि थोड्या दिवसांपुरता राजकारणी घाबरले होते, मात्र त्यावरही उपाय योजना शोधून निवडणूक जिंकण्यासाठी काहीही करण्यास उमेदवार मागे पुढे पाहत नाहीत. हल्ली निवडणूक म्हटले की कार्यकर्त्यांची व मतदारांची चंगळ असते. निवडणुका जाहीर होण्याच्या आधीपासूनच मटणाच्या पार्ट्या सुरू असतात, तर निवडणुकीच्या आदल्या रात्री दरवाजा उघडा ठेऊन टीव्हीचा आवाज मोठा ठेऊन रात्र रात्र जगणारे मतदार अनेक ठिकाणी बघायला मिळतात. याचा 'अर्थ' असा की आम्ही जागे आहोत. हल्ली कोटी रुपये म्हणजे काहीच नाही असे झाले आहे. त्याला खोक्याची उपमा दिली आहे. निवडणुक काळात पोलिसांच्या सतर्कतेने वाहनांची तपासणी करताना दहा -पंधरा कोटी रुपये सहज पकडले जातात.

कर्जत तालुक्याबद्दल बोलायचे झाले तर नगर परिषदेच्या झालेल्या निवडणुकीत कर्जत नगर परिषद राष्ट्रवादी काँग्रेस-उद्धव सेना परिवर्तन आघाडीने जिंकली, तर माथेरान नगरपरिषद शिंदे सेना-भाजप महायुतीने जिंकली. त्यामुळे दोघांनाही मतदारांनी साथ दिल्याचे चित्र आहे. उपनगराध्यक्षपदाची निवडणूक होता होता जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक जाहीर झाली. वेळ अगदी थोडा असल्याने उमेदवारी देणे, बंडखोरी रोखणे, प्रचार करणे यासाठी कसरत करावी लागत आहे. जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक जाहीर झाली आणि आपला पत्ता कट होणार किंवा आपली या पक्षाकडून उमेदवारी मिळाली तरी आपली डाळ शिजणार नाही. याचा अंदाज असल्याने अनेक जण पक्ष सोडून अन्य पक्षात उड्या मारून उमेदवारी मिळविण्याची धडपड करताना दिसतात, तर काही पक्षाचे वरिष्ठ नेते एखादा चांगला उमेदवार शोधताना तो गळाला कसा लागेल या प्रयत्नात असतात. आता केवळ तीन दिवस राहिले असताना गणिते कशी जुळवायची यासाठी बैठका सुरु आहेत.

एकाच कुटुंबातील चार सख्खे भाऊ निरनिराळ्या पक्षात आहेत. इतकेच नाही तर बाप एका पक्षात तर मुलगा दुसऱ्या पक्षात असेही निवडणुकीच्या तोंडावर घडत आहे. याची अनेक उदाहरणे या निवडणुकीत दिसून येत आहेत. त्यामुळे कोणताही पक्ष सत्तेत आला की, आपल्याला फरक पडत नाही. सगळेच आपले अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. यामुळे कार्यकर्त्यांचे मरण झाले आहे. या निवडणुकीमध्ये काही पक्षांना अस्तित्वाची लढाई, तर काही जण आपले वर्चस्व कसे असेल यासाठी प्रयत्नशील आहेत.

# जीवनवादी लेखक वि.स. खांडेकर

कोटिबाजपणा, वास्तववादी, व्यामिश्र आणि प्रयोगशील अशी लेखनाची वैशिष्टचे असलेल्या श्रेष्ठ कादंबरीकार, लेखक विष्णू सखाराम खांडेकर यांचा आज स्मृतिदिन. ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे त्यांचा जन्म झाला. गणेश आत्माराम खांडेकर हे त्यांचे मूळ नाव.

गणेश खांडेकर यांचे वडील आत्माराम बळवंतराव खांडेकर यांचे १९११ रोजी निधन झाले. आत्माराम खांडेकर यांचे चुलत भाऊ सखाराम खांडेकर यांनी गणेश आत्माराम खांडेकर यांना दत्तक घेतले. त्यानंतर ते विष्णू सखाराम खांडेकर या नावाने ओळखले जाऊ लागले.



मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांनी आठवा क्रमांक पटकावला. मॅट्रिकमध्ये उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी पुणे गाठले. येथे फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. या काळात त्यांचा परिचय बालकवी, गणपतराव बोडस, अच्युतराव कोल्हटकर इत्यादी साहित्यिकांशी झाला. याच काळात त्यांनी लेखनालासुद्धा सुरुवात केली. 'रमणीरत्न' हे पहिले नाटक त्यांनी लिहिले. पण बिकट परिस्थितीमुळे इंटरच्या वर्गातच त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले.

महाविद्यालय सोडल्यावर सावंतवाडीत राहणाऱ्या आपल्या बहिणीकडे वि.स.खांडेकर राहू लागले. इ. स. १९२०मध्ये सिंधुदुर्गातील शिरोडे या गावी त्यांनी शिक्षक म्हणून नोकरीस सुरुवात केली. इ. स. १९३८पर्यंत त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. शिरोड्यातील ट्युटोरियल इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी करीत असतानाच लवकरच ते मुख्याध्यापकसुद्धा झाले. शिरोड्याचा त्यांचा काळ उमेदीचा होता. या १९१९नंतर शिक्षक म्हणून नोकरी करीत असतानाच त्यांनी विपुल लेखन केले. कादंबरी, लेख, विनोदी साहित्य, काव्य असे सर्वच साहित्य प्रकारात त्यांनी उत्कृष्ट लिखाण केले. १९३८नंतर ते कोल्हापूरमध्ये स्थायिक झाले. १९७४ साली साहित्यातील ज्ञानपीठ या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. साहित्यातील कारकीर्द लक्षात घेऊन भारत सरकारनेदेखील त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने गौरवले. २ सप्टेंबर १९७६ रोजी या ज्येष्ठ साहित्यिकाचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)




# 'या' चुकांमुळे स्मार्टफोन लवकर होऊ शकतो खराब

आजच्या काळात स्मार्टफोन हा आपल्या शरीराचा एक अविभाज्य भाग बनला आहे. बँकिंगपासून



मनोरंजनापर्यंत सर्व गोष्टी मोबाईलवर अवलंबून आहेत. कंपन्या कोणताही फोन ३-४ वर्षे टिकेल या हिशोबानेच बनवतात, पण तो किती काळ टिकणार हे सर्वस्वी वापरकर्त्याच्या हाताळणीवर अवलंबून असते. जर तुम्हाला तुमचा महागडा स्मार्टफोन वर्षानुवर्षे नवा कोरा ठेवायचा असेल, तर काही सामान्य वाटणाऱ्या पण गंभीर चुका टाळणे आवश्यक आहे.

सॉफ्टवेअर अपडेट टाळणे पडू शकते महाग

अनेक जण इंटरनेट डेटा वाचवण्यासाठी किंवा आळसामुळे मोबाईलचे 'सॉफ्टवेअर अपडेट' करत नाहीत. ही सर्वात मोठी चूक आहे. अपडेट न केल्यामुळे फोनचा वेग तर कमी होतोच, पण सायबर हल्ल्याचा धोकाही कैक पटीने वाढतो. कंपन्या अपडेट्सद्वारे नवीन सुरक्षा फीचर्स पाठवत असतात, त्यामुळे अपडेट कधीही स्किप करू नका.

**फोन 'रिस्टार्ट' करण्याची सवय लावा**

बहुतेक लोक फोन जोपर्यंत हँग होत नाही किंवा काही तांत्रिक अडचण येत नाही, तोपर्यंत तो कधीच बंद किंवा रिस्टार्ट करत नाहीत. तज्ज्ञांच्या मते, फोनमधील सॉफ्टवेअरच्या छोट्या अडचणी दूर करण्यासाठी आणि रॅम क्लियर करण्यासाठी आठवड्यातून किमान एकदा फोन रिस्टार्ट करणे आवश्यक आहे. यामुळे फोनची कार्यक्षमता सुधारते.

**बॅटरी १००% चार्ज करण्याची गरज नाही!**

अनेकांना सवय असते की बॅटरी पूर्ण १००% झाल्याशिवाय ते चार्जर काढत नाहीत, किंवा फोन पूर्णपणे बंद होईपर्यंत तो चार्ज करत नाहीत. या दोन्ही सवयी बॅटरीच्या आरोग्यासाठी घातक आहेत. तज्ज्ञांच्या मते, मोबाईलची बॅटरी २०% ते ८०%च्या दरम्यान राखणे सर्वात उत्तम असते. यामुळे बॅटरीचे आयुष्य वाढते.

**अनोळखी स्त्रोतांकडून ॲप्स डाऊनलोड करणे टाळा**

गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअर सोडून इतर कोणत्याही वेबसाईटवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. या ॲप्समध्ये 'मालवेअर' किंवा व्हायरस असू शकतात, ज्यामुळे तुमच्या खाजगी माहितीवर हॅकर्स डल्ला मारू शकतात आणि तुमचा फोन कायमचा खराब होऊ शकतो.

# विनोदी लेखक चिंतामण जोशी

प्रसिध्द मराठी विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी...



**निमित्त**

चिंतामण विनायक जोशी यांचा जन्म १९ जानेवारी १८९२ रोजी पुणे येथे झाला. 'सुधारक' या पत्राचे संपादक वि. रा. जोशी हे त्यांचे वडील होते. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात झाले. फर्ग्युसन कॉलेजातून बीए (१९१३), एमए (१९१६) झाले. त्यांनी चाळीसपेक्षा अधिक पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्त्वाची होय. पाली भाषेचा त्यांचा विशेष अभ्यास होता. बडोदे महाविद्यालयात ते पाली विषयाचे प्राध्यापक होते.

त्यांचे वडील विनायक रामचंद्र जोशी हे शिक्षक होते. त्यांनी आगरकर यांच्या सुधारक या वृत्तपत्राचे काही काळ संपादनही केले होते. सार्वजनिक काका म्हणून ओळखले जाणारे गणेश वासुदेव जोशी हे देखील जोश्यांच्याच घराण्यातले होते. चिं. वि. जोशी यांचे बहुतांशी लेखन हे विनोदी वाङ्मय असले तरी ते व्यावहारिक जीवनात ते धीरगंभीर प्रवृत्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या मुलाचा अकाली मृत्यू झाला होता, त्यामुळे ते दुःखी असत.

दूरचित्रवाणीवरची 'चिमणराव-गुंड्याभाऊ' ही मालिका खूप गाजली. मालिकेत चिमणरावांचे काम दिलीप प्रभावळकरांनी, गुंड्याभाऊचे बाळ कर्वे यांनी, चिमणरावांच्या पत्नीचे (कावेरीचे-काऊचे) स्मिता पावसकर यांनी, मैना या कन्येचे काम अरुणा पुरोहित यांनी तर मोरू व राघू या पुत्रांचे काम अनुक्रमे नीरज माईणकर व गणेश मतकरी यांनी केले होते. सुषमा तेंडुलकर, लक्ष्मीकांत बेर्डे, सुलभा कोरान्ने या व इतर बऱ्याच कलाकारांनी देखील या मालिकेत काम केले होते. या मालिकेच्या निर्मात्या विजया जोगळेकर-धुमाळे होत्या.

चिं.वि. जोशी यांच्या कथेवर सन १९४२ मध्ये 'सरकारी पाहुणे' नावाचा चित्रपट निघाला होता. त्याचे दिग्दर्शन मास्टर विनायक यांनी केले होते. चिमणरावांची भूमिका दामुअण्णा मालवणकर यांनी केली होती. चिं.वि.जोशींच्या, संध्या बोडस-काणे व अलका जोशी-मांडके या नातींनी संकलित केलेले 'चि.वि. जोशी - साहित्यातले आणि आठवणीतले' हे पुस्तक कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने छापून प्रसिद्ध केले आहे. अक्षरधारा प्रकाशनाने 'विनोदाचे बादशहा चिं. वि जोशींचे निवडक विनोद' नावाचे एक अतिशय छोटे पुस्तक प्रकाशित केले आहे. विनोदांचे संकलन रवींद्र कोल्हे यांनी केले आहे.

विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर-गडक-यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या 'एरंडाचे गु-हाळ (१९३२)'मधील लेखन व 'चिमणरावांचे च-हाट (१९३३)', मधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो. या मराठी लेखकांबरोबरच मार्क ट्वेन, डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्स, जेरोम के जेरोम, हर्बर्ट जेकिन्स, स्टीफन लीकॉक यांच्या विनोदी लेखनाचे संस्कार त्यांच्यावर झाले. मुंबई येथे ते २१ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन पावले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# अनेक समस्यांवर रामबाण उपाय लवंग

हिवाळा सुरू झाला की लोकांना सर्दी आणि खोकल्याचा सर्वाधिक त्रास होतो. सर्दी, कफ आणि खोकल्यामुळे लोकं त्रस्त होतात. अनेक वेळा यातून लवकर बरे होत नाहीत. अशा वेळी काही घरगुती उपाय केले पाहिजेत. खोकला बरा होत नसेल तर अनेक प्रभावी उपाय आहेत. कोरड्या खोकल्यापासून मुक्त होण्यासाठी तुम्ही लवंगचा वापर करु शकता. लवंग मधात मिसळून खाल्ल्यास कोरड्या आणि ओल्या खोकल्यापासून त्वरित आराम मिळतो.



**मध आणि लवंग**

खोकला असेल तर मध आणि लवंग हे उत्तम उपाय आहेत. साधारण ७-८ लवंगा घ्या आणि गरम तव्यावर हलक्या हाताने भाजून घ्या. लवंगा थंड झाल्यावर बारीक पावडर करुन घ्या. आता यामध्ये ३-४ चमचे मध घाला. थोडे गरम करुन घ्या आणि आता सकाळी, संध्याकाळी आणि दुपारी प्रत्येकी एक चमचा खा. यामुळे खोकल्यापासून त्वरित आराम मिळेल. फक्त २-३ दिवस खाल्ल्याने तुम्हाला फरक दिसू लागेल. यानंतर अर्धा तास पाणी पिऊ नका.

**लवंग खाण्याचे फायदे**

लवंगात दाहक-विरोधी गुणधर्म असतात ज्यामुळे सूज कमी होते. सांधेदुखीमध्ये लवंग खूप फायदेशीर आहे.

लवंगात युजेनॉल नावाचे अँटीऑक्सिडंट असते जे फ्री रॅडिकल्स, हृदय, मधुमेह आणि कर्करोगाचा धोका कमी करते. लवंग पोटातील अल्सर कमी करते आणि पोटाच्या आवरणाचे रक्षण करते. हिवाळ्यात लवंग खाल्ल्याने श्लेष्मा घट्ट होतो आणि श्लेष्मा काढून टाकण्यास मदत होते. लवंग पोटफुगी, गॅस आणि पचनाच्या समस्या दूर करण्यास मदत करते.

लवंगात अनेक एंजाइम असतात जे पचन सुधारण्यास मदत करतात. तोंडाच्या आरोग्यासाठी लवंग खूप फायदेशीर आहे. लवंगाचा वापर हिरड्यांना रोग, प्लेक किंवा बायोफिल्मपासून संरक्षण करण्यासाठी केला जातो. लवंगमध्ये व्हिटॅमिन सी असते जे शरीरातील पांढऱ्या रक्त पेशी वाढवण्यास मदत करते. यकृताच्या कार्यास लवंग प्रोत्साहन देते. दातदुखीपासूनदेखील यामुळे आराम मिळतो.

लवंग हाडांसाठी देखील चांगले असते. तोंडात असलेले बॅक्टेरियादेखील लवंग काढून टाकते. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासदेखील लवंग मदत करते.

# खालापूरच्या एचपी अडेसिव्ह कंपनीत भीषण आग





**खोपोली, खालापुर : प्रतिनिधी**

शनिवारी संध्याकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास खालापूर तालुक्यातील नारंगी येथील एच पी अडेसिव्ह कंपनीत भीषण आग लागली .सदर बाब कंपनी व्यवस्थापन व गावकऱ्यांनी हेल्प येथील फाउंडेशन, खोपोली अग्निशमन दल, खालापूर पोलीस व तहसीलदार यांना कळविल्यानंतर आजूबाजूच्या कंपन्या, मार्ग ग्रुप अंतर्गत अन्य कंपन्या यांनी आपत्कालीन मदतीचा हात दिला .

डोणवत गावाजवळच्या एचपी इंटरनॅशनल कंपनीत शनिवारी एसीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. ज्वालाग्राही पदार्थ असल्याने आगीचा भडका वाढतच गेल्याने कंपनी कामगार व आसपासच्या गावात काही काळ घबराट निर्माण झाली होती. कंपनीतील उत्पादन प्रक्रिया करणारा विभाग पूर्णपणे आगीत खाक झाला. मात्र पुन्हा आगीचा भडका वाढतच गेल्याने दुसऱ्या विभागाला ही आग लागली.

आगीतील धुरामुळे कामगारांचा श्वास कोंडल्याने तत्काळ खोपोली येथील जाखोटिया रुग्णालयात दाखल करण्यात आले. आसपासच्या गावात काही काळ घबराट निर्माण झाली होती.

सदर कंपनी मध्ये थिनर बेस , कलर बेस व बांधकाम साठी लागणारे केमिकल्स बनविण्यात येतात .आग नेमकी कशा मुळे लागली या बाबत खालापूर पोलिस, तहसीलदार यंत्रणा , रायगड औद्योगिक व आरोग्य विभाग, पर्यावरण विभाग यांच्या कडून चौकशी सुरू झाली आहे.

आग विझविण्यासाठी तहसीलदार अभय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार , रायगड औद्योगिक सुरक्षा विभागाचे डायरेक्टर विक्रम कट्टमवार यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली नगरपालिका,हेल्प फाउंडेशनचे कार्यकर्ते तसेच खोपोली, खालापूर ,रसायनी परिसरातील सर्व मोठ्या कंपन्यांचे अग्निशमन दल, फायर टेंडर यात आलाणा फायर टेंडर, रिलायन्स फायर टेंडर, टाटा फायर टेंडर४. ए एम /एनएस, पेन नगर परिषद, गोदरेज फायर टेंडर, खोपोली फायर टेंडर, मंगलम केमिकल कंपनी फायर टेंडर सह अन्य कंपनीच्या गाड्या, उपयुक्त सामुग्रीसह आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत होत्या.

कंपनीला लागून असलेल्या नारंगी गांव व नारंगी लहान वाडी येथील नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये व हानी होऊ नये यासाठी स्थानिक पोलिस पाटील , सरपंच व सामाजिक कार्यकर्त्यांनी विशेष लक्ष दिले.प्रचंड मोठ्या प्रमाणात अग्नी तांडव , केमिकल ड्रम चा होणारा स्फोट अशा भयानक स्थितीत सर्व यंत्रणानी ही आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केला.

### *ग्रामस्थ भडकले; कारखाना बंद करण्याची मागणी*

***रविवारी आज परिसरातील, गावातील ग्रामस्थ ,महिला मोठ्या संख्येने प्रवेशद्वारावर जमा झाले होते. कारखाना व्यवस्थापन सरपंच आणि उपसरपंच यांना हाताशी धरून बेकायदेशीरपणे धोकादायक उत्पादन घेत असून हा कारखाना बंद व्हावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली. कारखान्याला कोणत्याही प्रकारची सुरक्षा साधने नसून कारखान्यातील फायरच्या लाईन मध्ये पाण्याचा एक थेंब नसल्याचे देखील उघडकीस आल्याने ग्रामस्थ अधिक संतापले. कारखाना व्यवस्थापनाने सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून कारखाना सुरू करावा अन्यथा कारखाना चालू देणार नाही अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली.***

## खोपोली काळोखे हत्याकांड प्रकरणात आणखी एकाला अटक



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश यांच्या हत्येच्या घटनेनंतर २४ दिवस फरार असलेला भरत भगत रा .अवसरे कर्जत यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने रविवारी खालापूर भागातून अटक केली.

खोपोली नगर परिषदेचे निवडणुकीनंतर शिंदे शिवसेनेचे कार्यकर्ते असलेल्या मंगेश काळोखे यांची हत्या शुक्रवारी २६ डिसेंबरला सकाळी खोपोली शहरात रहदारीचे ठिकाणी झाली होती. मंगेश यांचे राजकीय विरोधक देवकर कुटुंबाने हत्येची सुपारी दिली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले होते. रविवारी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगड पथकाने खालापूर परिसरातून भरत भगत यांना अटक करत खालापूर न्यायालयात हजर केले आरोपी भगत यांना मंगळवार २० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. भरत भगत यांनी त्यांच्या नेहमीच्या दाढीला बगल देत क्लीन शेव ठेवल्याने त्यांना ओळखणे अवघड झाले होते.

# भाजप कर्जत ग्रामीण मंडळ सरचिटणीसपदी निलेश पिंपरकर



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे तीन मंडल असून त्यातील कर्जत ग्रामीण मंडळाचे सरचिटणीस पदावर तरुण कार्यकर्ते निलेश पिंपरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत पिंपरकर यांच्यावर सरचिटणीसपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील भारतीय जनता पार्टी कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या व्यापक चर्चे संदर्भात भाजप कर्जत ग्रामीण मंडळची आढावा बैठक घेण्यात आली. ही आढावा बैठक अक्षदा मंगल कार्यालय कशेळे येथे पार पडली.

यावेळी कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ, ग्रामीण मंडळ सरचिटणीस सचिन म्हसकर, जनार्दन म्हसकर, बाळा भोईर, काशिनाथ रसाळ, दीपक पालांडे, रमेश आहीर, भगवान डोंगरे, रवींद्र जाधव आदी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये इच्छुक उमेदवारांनी आपली इच्छा प्रकट केली. ग्रामीण मंडळाचे कार्यकर्ते जो निर्णय घेतील त्या निर्णयासोबत कर्जत ग्रामीण मंडळ आपली दिशा ठरवणार. असे दिनेश रसाळ यांनी यावेळी सांगितले. त्यानंतर सरचिटणीसपद रिक्त असल्यामुळे दिनेश पिंपरकर यांची कर्जत ग्रामीण मंडळ सरचिटणीस पदी निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले.

ग्रामीण मंडल अध्यक्ष दिनेश रसाळ यांनी रिक्त असलेल्या सरचिटणीस पदासाठी सर्व वरिष्ठ कार्यकर्त्यांशी चर्चा केली आणि विचार विनिमय करून तसेच निलेश पिंपरकर यांनी भारतीय जनता पार्टी कर्जत ग्रामीण मंडळ यासाठी योग्य असे संघटन आणि पार्टीसाठी दिलेले योगदान लक्षात घेता पिंपरकर यांची भारतीय ग्रामीण मंडळ कर्जत सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली.

# वडगावचे जागतिक पाऊल, ग्रामीण विद्यार्थ्यांना जगाशी जोडण्याचा प्रयत्न

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आदिवासीवाडी वस्ती व वडगाव सारख्या माणिकगडाच्या पायथ्याशी डोंगरात वसलेल्या वडगाव या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणारी शेकडो मुले आज १७ जानेवारी रोजी डिजिटल दूरस्थ Google Meet च्या माध्यमातून डॉ.संगीता तोडमल(NRI)पर्यावरण तज्ञ, (Georgia State)अमेरिका यांच्याशी संवाद साधला.

या वेळी डॉ. तोडमल यांनी भारतीय व अमेरिकीन या दोन ध्रुवाच्या टोकाच्या देशातील वर्तमान वेळ, तेथील वातावरण, हवामान, घरांची रचना, वनस्पती, प्राणी यांच्यातील साम्य व फरक चांगल्या पद्धतीने स्पष्ट करत एकतास संवाद साधत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनींसुद्धा प्रश्न विचारून आपली जिज्ञासा दाखवली.तेथील सण उत्सव, पर्यावरण धोरण, तिथले प्राणी, शेती याविषयी व घरांविषयी प्रश्न विचारून उत्तरे मिळवत चर्चेत सहभाग नोंदवला.शाळेचे दूरस्थ डिजिटल पद्धतीने पूर्ण पाहणीं करून कौतुक करत डॉ. संगीता तोडमल यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले.



**दोन देशांचा तुलनात्मक अभ्यास व तोसुद्धा प्रत्यक्ष आभासी पद्धतीने यामुळे मुलांना वर्ल्डव्हाइल्ड विचार करण्यास पूरक असा उपक्रम आहे.**

**-डॉ.संगीता तोडमल, पर्यावरणतज्ञ, जॉर्जिया अमेरिका**

**एक डिजिटल पाऊल ग्रामीण विद्यार्थ्यांना जगाशी जोडण्याचा...हा दप्तरमुक्त शनिवार या उपक्रमनतर्गत सुरू करण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना शाळेत बसून जगाची अभ्यास सहल करता येईल. आज पहिले पुष्प डॉ. संगीता तोडमल पर्यावरण तज्ञ यांनी खूप छान मार्गदर्शन करत सुरुवात की. पुढच्यावेळी नवीन देशांसह पुन्हा हे सत्र आयोजित केले जाईल.**

**-सुभाष राठोड, मुख्याध्यापक, शाळा वडगाव**

**अमेरिकेत लाकडाची घरे व केसाळ प्राणी म्हणजे गोरीलासारखे व अस्वलासारखे प्राणी का असतात हे आजच्या सत्रातून छान शिकता आले. डॉ. तोडमल मॅडम आम्हा विद्यार्थ्यांकडून तुमचे खूप आभार!**

**-कस्तुरी जाधव, विद्यार्थिनी इयत्ता सहावी**

तिथली शिक्षण पद्धती व प्रशासन पद्धती विषयी मार्गदर्शन करताना शाळा, संरचना, अभ्यासक्रम, वेळापत्रक व विशेष म्हणजे गणवेश नसणे तसेच डायरेक्ट कौंटीच्या मेयर कडूनच प्रवेश दिले जातात हे विद्यार्थ्यांना विशेष वाटले. या सत्रात पर्यावरण व पर्यावरण पूरक सण उत्सव याविषयी जास्तीतजास्त मार्गदर्शन केले. मुलांनी डॉ.संगीता तोडमल यांना मॅम तुम्ही तिथे भारतीय सण साजरे करता का असे विचारल्यावर त्यांनी होय. ते आपली परंपरा व संस्कृती चा भाग आहे तो वारसा आपण सर्वांनी कुठेही जगाच्या पाठीवर असलो तरी जपला पाहिजे. महू या ठिकाणी सगळे सण भारतीय पद्धतीने साजरे करतो.

या वेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष राजश्री नरेंद्र जांभुळकर, सदस्य, पालक व विद्यार्थी तसेच वैजनाथ जाधव, मयुरी धायगुडे, संकेत काठोळे हे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी केले तर स्वागत राजश्री जांभुळकर यांनी केले,आभार मयुरी धायगुडे यांनी मानले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कस्तुरी जाधव हिने या सत्राचे संचालन व नेतृत्त्व केले.

## गंगावणे आदिवासीवाडीतील आगीत आंब्याची कलमे जळून खाक




**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेनजिक असलेल्या गंगावणे आदिवासीवाडीतील वरवलीचा माळ या परिसरात मंगळवार दि. १३ जानेवारी रोजी दुपारी लागलेल्या आगीत दिडशेहून अधिक आंब्याची कलम जळून खाक झाली आहेत.

मोहर येण्याच्या ऐन हंगामात लागलेल्या या आगीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आग लागलेला परिसर मनुष्य वस्ती पासून लांब असल्यानमुळे पुढे होणारा अनर्थ टळला आहे. परंतु आग सर्वत्र परिसरात पसरल्याने ग्रामस्थांना विझवण्यात अडथळा निर्माण होत होता. आगीने वरवलीचा माळ परिसरातील श्री. चाह्या ठमा पारधी यांच्या मालकीची ७५ आंबे इतर चिकू, पेरू ची झाडे तर श्री. शंकर गोमा फासले यांच्या मालकीची ४० हून अधिक आंब्याची झाड या आगीमध्ये जळून खाक झालेली झाली आहेत.

दोन किलोमीटर अंतरावरून पाणी डोक्यावर आणून येथिल शेतकऱ्यांनी झाडे वाढवली होती. आपल्या डोळ्यासमोर झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी होताना पाहून शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत तात्काळ पंचनामा करून योग्य तो मोबदला मिळावा अशी मागणी गंगावणे ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. पेण तालुक्यातील गंगावणे हे निसर्गरम्य ठिकाण असून मोठा माळरान आहे. विविध वनसंपदेने नटलेला हा परिसर आहे. शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशी इथे मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात.



मुरुड : येथील समुद्र किनारी हिवाळ्यात सूर्याचे आकारमान वाढलेले दिसते. सायंकाळी सूर्यास्त होताना सुंदर रंग पहायला मिळतात. त्यामुळे पर्यटक हे रंग पाहण्यासाठी खास मुरुडला येतात. (छाया : सुधीर नाझरे)


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **उर्मिला अशोक गावंड, जयवंती गणेश पाटिल व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कोप्रोली (553339)**
(PU-ID : 21618978702), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २२२/१/ब **खाते क्र. ५४६** | १ | ०.१०.९० पो.ख. ०.००.५० | १.६२ |
| | | **एकुण ०.११.४०** | |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे ०.११.४०** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-पाले बुद्रुक, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**
**मौजेः पाले बुद्रुक, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| पाले बुद्रुक | १. बळीराम भिवा भोईर रा. पाले बुद्रुक, ता. पनवेल जि. रायगड | १०२/२ | ०.०७.३० ०.००.०० ०.०७.३० | १.३१ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १९/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को.ऑ. सोसायटी, प्लॉट नं.१२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६.**



महावितरण

### ई निविदा जाहिर सुचना

खालील कामाकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई निविदा बोलाविण्यांत येत आहे.
निविदेचा तपशील खाली देण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचा तपशील | निविदा रक्कम/ निविदा अनामत/ निविदा मुल्य | निविदा विक्री/ खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | काअ / पनवेल ग्रा. / तां. / निविदा १० / २०२५-२६ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोर्स मधुन प्राप्त झालेले मटेरियल आणि इकिविपमेंट ९ मिटर टन पर्यंत ट्रान्सपोटेशन व मटेरियल हॉडलिंग करणे बाबतचा ठेका. | रू. ०५.०० लाख रू. ५,०००/ | १९.०१.२०२६ पासून २९.०१.२०२६ पर्यंत |

अधिक माहिती साठी कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल ग्रामीण विभाग, भिंगारी, पनवेल, जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा. संपर्क अधिकारी श्री. दिपक र. चव्हाण मो. नं. ९०२९१६२७८१

**कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग**

# जेएनपीएत धूळ नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित

## बंदर परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांकात लक्षणीय घट

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीए बंदराच्या कार्यक्षेत्रात जवळपास ५० हजारा पेक्षा अधिक जड वाहनांची वाहतूक होत आहे. त्यामुळे यापरिसरात धुळीचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे बंदराच्या सभोवतालच्या परिसरातही मोठ्या प्रमाणात निर्माण होणारी धूळ नियंत्रीत करण्यासाठी जेएनपीए कडून उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे या परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांकात घट झाली असून ही मात्रा १०० एक्यूआय पेक्षा कमी नोंदविली गेली असल्याचा दावा जेएनपीए प्रशासनाने केला आहे.



जेएनपीए प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या हरित उपक्रमा अंतर्गत निरीक्षण यंत्रणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. यानिमित्ताने शाश्वत विकासाच्या दिशेने जेएनपीएची वाटचाल सुरू आहे. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा आणि स्वच्छ तंत्रज्ञानावर भर देत बंदराने हरित भविष्याकडे महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मागील वर्षाच्या तुलनेत पीएम १० पातळीवर होता. विशेषतः नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत अनुक्रमे सुमारे ३३ टक्के आणि २९ टक्के इतकी लक्षणीय घट झाली असून, हिवाळ्याच्या उच्च कालावधीत धूळजन्य प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे हे स्पष्टपणे दर्शवते.

पीएम २.५ पातळीपर्यंत नोंदविला गेला आहे. त्यानुसार नोव्हेंबर महिन्यात पीएम २.५ मध्ये सुमारे २५ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. या आकडेवारीनुसार हंगामादरम्यान मोठ्या आकाराच्या कणांमुळे होणारे प्रदूषण लक्षणीय प्रमाणात कमी झाल्याचे स्पष्ट होते. ऑक्टोबर २०२५पासून बंदरातील प्रमुख कार्यक्षेत्रांमध्ये यांत्रिक रस्ते-धूळ स्वच्छता वाहने तसेच धूळ दमन यंत्रांची अंमलबजावणी सुरू करण्यात आल्याने हवा गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. जेएनपीए यांच्या सर्वसमावेशक पर्यावरण व्यवस्थापन प्रणालीचा तसेच व्यापक ग्रीन पोर्ट धोरणाचा अविभाज्य भाग आहेत.

# उरणमध्ये चार जि.प., आठ पं.स. जागांसाठी रणधुमाळी

## ग्रामीण भागात राजकीय हालचालींना वेग

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्रातील महानगरपालिकांचे निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समितीचे निवडणूक होणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका त्वरित पार पडणार असून जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक एकाच दिवशी म्हणजेच ५ फेब्रुवारी २०२६ रोजी तर ७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीचा एकत्रित निकाल लागणार आहे. उरण तालुक्यात चार जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती सदस्य पदासाठी निवडणूक होणार आहे. दिनांक १६ जानेवारी २०२६ पासून उमेदवारी अर्ज भरायला सुद्धा सुरवात झाली आहे.

**एकूण जिल्हा परिषद व त्यांचे आरक्षण**

१) नवघर – सर्वसाधारण स्त्री
२) जासई – नागरिकांचा मागस प्रवर्ग (ना.मा.प्र)
३) चाणजे – सर्वसाधारण स्त्री
४) चिरनेर – नागरिकांचा मागास प्रवर्ग (ना.मा.प्र) पंचायत समिती व त्यांचे आरक्षण
१)नवघर– नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र)
२) भेंडखळ –सर्वसाधारण
३)जासई –सर्वसाधारण स्त्री
४)चिर्ले –नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री (ना. मा.प्र.स्त्री )
५) केगाव –सर्वसाधारण
६) चाणजे – सर्वसाधारण
७) चिरनेर –सर्वसाधारण स्त्री
८) आवरे – सर्वसाधारण स्त्री

# गव्हाण विद्यालयात चित्रकला स्पर्धेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये चित्रकला, वक्तृत्व व निबंध आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून शनिवारी (दि.१७) शालेय अंतर्गत चित्रकला स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कला शिक्षक गणेश भोईर यांच्या नियोजनात पार पडलेल्या चित्रकला स्पर्धेस इयत्ता पाचवी ते नववी अखेरच्या शेकडो विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद देवून विविध प्रकारचे रंगछटांयुक्त चित्रकलाविष्कार कागदावर उतरवले.

या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर आणि पर्यवेक्षिका शशिकला यांचेसह विद्यालयाच्या माजी प्राचार्या साधना डोईफोडे यांनी स्पर्धेस भेट देवून विद्यार्थ्यांचे कलाविष्कार न्याहाळून विद्यार्थ्यांची वाहवा केली.



# रसायनीत श्री साईबाबा मंदिरात वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

एचओसी वसाहत मोहोपाडा रसायनी येथील श्री साईबाबा मंदिराच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून रायगडसह इतर भागातील भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.यानिमित्ताने बुधवार दि.२१ जानेवारी रोजी दुपारी हळदीकुंकू समारंभ, गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी सकाळी भुपाळी काकड आरती,महामंगल स्नान , अर्चना,आरती,सकाळी ९ ते १२ वाजता वास्तुशांती यज्ञ, मध्यान्ह आरती, सायंकाळी सांज आरती, सायंकाळी मोहोपाडा येथे पालखी मिरवणूक, रात्री ९:३० शेजआरती तसेच शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी वसंत पंचमी प्रमुख उत्सव दिनानिमित्त सकाळी भुपाळी,काकड आरती,२७ लिटर दुग्धाभिषेक,महामंगळ स्नान, गणपती होम,श्री रुद्र एकादशनी याग पुर्णाहुती, दुपारी अर्चना,आरती,प्रसार वितरण, सायंकाळी हभप बाळकृष्ण महाराज पाटील यांचे संगीत भजन, यानंतर सांज आरती व महाप्रसाद वितरण, सायंकाळी राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन, रात्री ज्ञानेश्वर भगत भजनी मंडळ यांचे संगीत भजन, रात्री शेजा आरती असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे श्री साईबाबा सत्संग केंद्राचे अध्यक्ष एम.एस. मगर यांनी केले आहे.



# वाशी येथे आयसीएनटीई आंतरराष्ट्रीय परिषद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील ऍग्नेल चॅरिटीजच्या फादर सी. रॉड्रिग्ज इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये (एफ.सी.आर. आय.टी.) १६ व १७ जानेवारी रोजी अभियांत्रिकी क्षेत्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञानावर आधारित सहावी द्वैवार्षिक आंतरराष्ट्रीय परिषद आयसीएनटीई-२०२६ यशस्वीरित्या पार पडली. या परिषदेची शाश्वत तंत्रज्ञान ही मध्यवर्ती संकल्पना होती.

आयईईई (आयईईई) बॉम्बे सेक्शन आणि आयईईई इंडस्ट्रियल ऍप्लिकेशन्स सोसायटी यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित या परिषदेत भारतासह परदेशातील संशोधक, शिक्षणतज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या परिषदेत एम्बेडेड सिस्टम्स व सिग्नल प्रोसेसिंग, नेटवर्किंग, सुरक्षा व कम्युनिकेशन इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल मशीन्स, पॉवर सिस्टम्स, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स व एनर्जी कन्व्हर्जन, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग व ऑटोमेशन, स्ट्रक्चरल डिझाईन व डायनॅमिक्स तसेच अल्गोरिदमचे विश्लेषण व डिझाइन अशा विविध विषयांवर शोधनिबंध सादर करण्यात आले.




या वेळी एफसीआरआयटीचे प्राचार्य डॉ.एस.एम.खोत यांनी भविष्यात शैक्षणिक संस्था अधिक संशोधन-केंद्रित होतील, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अर्थपूर्ण संवादासाठी ऑफलाइन शैक्षणिक कार्यक्रमांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. या परिषदेचे अतिथी आणि मुंबईतील ऍटलस स्किलटेक विद्यापीठाचे वरिष्ठ संचालक डॉ.शशिकांत पाटील यांनी आयईईईचे महत्त्व विशद करत जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे वाढते वर्चस्व अधोरेखित केले.

या वेळी आयआयटीचे माजी संचालक डॉ.आर.के. शेवगावकर यांनी शाश्वत तंत्रज्ञान या विषयावर बीजभाषण केले. शाश्वतता ही केवळ ग्रीन टेक्नॉलॉजी पुरती मर्यादित न राहता समाजाच्या सर्व घटकांवर सकारात्मक व समावेशक परिणाम करणाऱ्या अभियांत्रिकी उपायांचा त्यात समावेश असावा, असे त्यांनी सांगितले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात कर्करोग जनजागृती

**उरण : वार्ताहर**

येथील रयत शिक्षण संस्थेच्यावीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे, लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस आणि दिपिशा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१६) आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयचे प्रभार प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी कार्यक्रमाचा महत्त्व सांगितले व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात दीपिशा फौंडेशनचे डॉ. दिपाली गोडघाटे कर्करोगाचे प्रकार, त्याची प्राथमिक लक्षणे, कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच वेळेवर तपासणीचे महत्त्व यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच दीपिका फाउंडेशन तर्फे कर्करोगाच्या निदानासाठी मोफत सेवा उपलब्ध आहे व कर्करोगा पासून बचाव करण्यासाठी लस उपलब्ध आहे ती कमीत कमी दरामध्ये किंवा मोफत उपलब्ध करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत त्याचा लाभ आपण सर्वांनी घ्यावा असे आवाहन केले.




उपक्रमासाठी तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या वेळी अकरावी आर्ट सायन्स कॉमर्स चे सर्व विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते त्यासाठी त्यांचे ज्युनिअर विभाग प्रमुख प्राध्यापक बाबुलाल पाटोळे सायन्स विभाग प्रमुख प्राध्यापक झुंजार माने कॉमर्स विभाग प्रमुख प्राध्यापक ऋषिकेश धुरी प्राध्यापक अरुण देवरे रेवेक्षिका थोरात मॅडम व त्यांच्या सर्व शिक्षक वर्गाने मोलाचे सहकार्य केले.

या वेळी लायन्स क्लबचे डॉ. मिलिंद पाटील, लायन श्री कोळी लायन उमेश पनवेल स्टील टाउनच्या अध्यक्ष लायन संगीता महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी लायन रमाकांत म्हात्रे लायन्स क्लब उरण गोल्डचे संदीप पाटील व सहकारी उपस्तिथ राहून सहकार्य केले.

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. या उपक्रमाचा लाभ ३५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी घेतला.

या उपक्रमामुळे समाजात आरोग्याविषयी जागरूकता वाढीस लागेल, तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजाराबाबत योग्य वेळी तपासणी व उपचार घेण्याचे महत्त्व अधोरेखित झाल्याचे मत अनेकांनी यावेळी व्यक्त केले

# चिरनेरला शेतकऱ्यांसाठी बायोचार निर्मिती प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करत, उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांसाठी शुक्रवारी (दि.१६) 'बायोचार' निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. या बायोचार निर्मितीच्या प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके चिरनेर येथील शेतकरी रामदास हरिभाऊ घबाडी यांच्या शेत-शिवारात दाखविण्यात आले.

शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने चिरनेर गावात शेतकऱ्यांसाठी 'बायोचार' (Biochar) निर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणात टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याविषयीचे शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



या वेळी शेतकऱ्यांना संबोधित करताना, सहाय्यक कृषी अधिकारी अक्षय राठोड यांनी पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते. यालाच बायोचार असे म्हणतात, असे सांगितले. तर उप कृषी अधिकारी ए डी बुरकुल यांनी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीवर भर द्यावा असे आवाहन करत रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. अशी माहिती दिली. शेतीतील काडीकचरा पिकांचे अवशेष यांचा वापर करून कमी ऑक्सिजनमध्ये ते जाळून कोळसा बायोचार तयार करण्याची प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. हे खत पिकांना कशाप्रकारे द्यावे याचे तांत्रिक नियोजन समजावून सांगितले.

यावेळी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, उपकृषी अधिकारी ए. डी. बुरकुल, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड, सहाय्यक अधिकारी विभावरी चव्हाण, बी टी एम नमिता वाकळे तसेच चिरनेर परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# उरण पाणजे परिसरात आढळले आशियन स्थलांतरित कॉप्स घुबड

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पाणजे परिसरात भटकंती करणारा युरोपियन व आशियन स्थलांतरित पाहुणा युरोपियन कॉप्स घुबड (OTUS SCOPS) पक्षी निरीक्षकांना आढळून आला आहे. उरणमध्ये या दुर्मिळ घुबडाचे दर्शन झाल्याने पक्षी निरीक्षण व पक्षी प्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे.

या घुबडाला मराठीत डुडूळा किंवा पांजरा म्हणतात. हा पक्षी खरं पाहता घुबड जातीतील उलुक गणात मोडतो. त्याची विण दक्षिण युरोप , पुर्व सायबेरियात आणि पश्चिम हिमालयात होते . त्याचे हिवाळी स्थलांतर दक्षिण आफ्रिकेतील सहारा पर्यंत होत असून तो मध्य युरोपमध्ये स्थायिक असतो.

हा दुर्मिळ पक्षी हिवाळी तसेच वसंत व शरद ऋतूत स्थलांतरित



होत असतो . पश्चिम भूमध्य समुद्र ओलांडणारा तसेच सहारा वाळवंट ओलांडून व्यापक स्थलांतर करणारा हा एकमेव युरोपीय घुबड आहे.भारतामध्ये मोजक्या २० पक्षांची नोंद या पक्षाच्या आजपर्यंत झालेली आहे.२०२१ मध्ये पश्चिम बंगाल येथे राजाहरट इथे त्याची नोंद झाली होती . झाडाच्या सालीसारखा ह्या पक्षाचा रंग असल्यामुळे त्याला ओळखणं हे महाकठीण असत.हा दुर्मिळ पक्षी पाणजे उरण येथील हमरस्त्यावरच आत्ता दिसत असून त्यासाठी अतिशय दर्जेदार पक्षी निरीक्षक व छायाचित्रकार उरण येथे भेट देत आहेत.

हा अतिशय मौल्यवान (लाइफर) पक्षी असल्यामुळे त्या ठिकाणी आज पक्षीनिरीक्षकांची गर्दी दिसत आहे. या दुर्मीळ भटकंती करणाऱ्या पाहुण्या पक्षाचे छायाचित्रण नवीन मुंबईतील पक्षी प्रेमी व निरीक्षक निलेश तांडेल यांच्यासह पक्षी तज्ञ वैभव पाटील व आयप्पन यांनी केले आहे. पाणजे पाणथळ परिसर हा जगातील विविध जातींच्या पक्षी आणि प्राण्यांचे अधिवास बनले आहे असे अधिवास आपण जपले पाहिजे, असे मत पक्षी तज्ञांनी व्यक्त केले आहे.

# मराठमोळ्या पोवाड्यासह शाहिरी गीतांचा कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

छत्रपतींचा इतिहास जनसामान्य लोकांमध्ये पोहचविण्यासाठी प्रथमेश भास्कर पुंडे यांची किल्ले प्रतापगड दर्शन मोहिम उत्साहात राबविली. या वेळी जयघोषाने प्रतापगड दुमदुमला. १४० पेक्षा जास्त शिवभक्तांनी सर केला प्रतापगड किल्ला. नवी मुंबई येथील लहान मूल, महिला, पुरुष यांनी घेतले प्रतापगडाचे दर्शन. आमच्या राजाचे पराक्रम, आयुष्य, वीरांचे बलिदान याच गडकिल्ल्यांनी बघितले आहेत. गडकिल्ले हेच खरे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक. माझे अस्तित्व छत्रपती शिवाजी महाराज आणि आमच्या पूर्वजांनी दिलेल्या बलिदानामुळे आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वकालीन सर्वश्रेष्ठ राज्यकर्ते होते. शिवाजी



महाराजांचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्म परायणतेचे होते. राज्यकर्ते म्हणून ते सर्वश्रेष्ठ तर होतेच, पण त्याचबरोबर ते व्यक्ती म्हणून सुद्धा आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठच आहेत.

महाराजांचे विचार जनसामान्यांत रुजावे यातून राष्ट्रप्रथम पिढी उभी रहावी हेच प्रमुख उदिष्ट. मराठी शाहीर वैभव घरत आणि सायली भोसले यांचा मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम वाई याठिकाणी आयोजित केला होता यासाठी वाईतील युवा नेते ओमकार जाधव व सहकार्यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच श्रउदय पोळ यांनी किल्ले प्रतापगड ,ऐतिहासिक वास्तू,मंदिर,घाट बद्दल दोन दिवस संगती राहून माहिती दिली.

किल्ले प्रतापगड मोहिमेतील लहान मुल, महिला – पुरुष यांचा उत्साह बघून आम्हाला अजून बळ मिळालं. या किल्ल्यावर सर्वांनी तहान, भुकेला प्राधान्य न देता फक्त आणि फक्त किल्ले दर्शनासाठी महत्व देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति असलेली श्रद्धा प्रेम याला प्राधान्य देऊन या मोहिमेचे महत्त्व पटवून दिले.

यावर्षीचा लहान शिवभक्त म्हणून माही अगरवाल व महिला शिवभक्त म्हणून मनिषा पाटील तर पुरुष शिवभक्त म्हणून पॅडी पाटील यांची निवड झाली. मोहिम यशस्वी होण्या साठी प्रथमेश भास्कर पुंडे आणि सर्व सहकार्यांचे कौतुक करण्यात आले

# भाजप नेते पंडितशेठ पाटील यांच्या गावभेटींना कोकबन चणेरा विभागातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**रोहा : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार पंडितशेठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली भावना पाटील यांनी घोसाळे जिल्हा परिषद गटामधील चणेरा विभागात खारगाव, आरेखुर्द, शेडसई, चांडगाव, दीव, कोकबन या ठिकाणी गावभेटी दिल्या.



भेटीमध्ये या गावांमध्ये दहा वर्षाआधी पंडितशेठ आमदार असताना त्यांनी बांधलेली समाजमंदिरे, रस्ते आणि पाणीपुरवठा यांची दुरवस्था पहायला मिळाली. माझ्या आमदारकीच्या कार्यकाळात मी केलेल्या विकासकामांची साधी दुरुस्तीही निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी केली नसल्याबाबत खेद व्यक्त करून या सर्व कामांची दुरुस्ती आता मीच पुन्हा करेन, असा शब्द पाटील यांनी गावातील नागरिकांना दिला.

चणेरा विभाग अध्यक्ष अतुल पाटील यांनी सांगितले की, आम्ही कार्यकर्ते म्हणून जेव्हा गावोगावी भेट देतो, तेव्हा तेथील जनताच आम्हाला पंडितशेठ यांनी आमच्या गावात याआधी कोणकोणती विकासकामे केली हे सांगते. त्यामुळे आम्हाला आमच्या नेत्याचा प्रचार करण्यासाठी आटापिटा करावा लागत नाही. येणाऱ्या काळात या विभागात पंडितशेठ यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची ताकद वाढणार आहे.

या वेळी युवा मोर्चा उपाध्यक्ष नंदेशदादा यादव यांनी, गावातील रखडलेली आणि नव्याने करण्यासारखी विकासकामे यांची नोंद करून पंडितशेठ पाटील ही कामे वेळेत करतील, असा विश्वास दर्शविला. त्यासाठी भावना पाटील यांनी जनतेने कोणत्याही आमिषाला बळी न पडता या वेळी घोसाळे जिल्हा परिषद सदस्य म्हणून मला निवडून द्यावे, असे आवाहन केले.

लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे गेली दहा वर्षे विकासकामांपासून वंचित राहिलेल्या चणेरा, घोसाळे आणि यशवंतखार विभागातील मतदारांनी भावना पाटील यांना निवडून दिल्यास पुन्हा एकदा पंडितशेठ पाटील यांच्या आगमनाने चणेरा विभाग विकासाकडे वाटचाल करेल अशी आशा जनतेमध्ये निर्माण झाल्याचे मत पत्रकार जितेंद्र जोशी यांनी व्यक्त केले.

या वेळी भाजप कार्यकर्ते यज्ञेश भांड, वसंत शेलार, स्वप्नील सानप, मोतीराम म्हात्रे, मंगेश मोहिते, स्वप्नील सावंत, बालकृष्ण पाटील, गंगाराम पाटील, सुरेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, सुहास भगत, नारायण गायकर, रणजीत भोपी आदी उपस्थित होते.

## बोरघाटात ट्रकची समोरील ट्रकला धडक

### चालक आणि क्लीनर जागीच ठार

**खालापूर : प्रतिनीधी**



मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर रात्री ब्रेकफेल ट्रकने समोरील ट्रकला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात चालक आणि क्लीनर जागीच ठार झाला.

एक्सप्रेस वेवर अपघाताची मालिका सतत चालू असून रात्री एक ट्रक (केए २३ ए ८३८८) हा चालक सुहास सुखदेव गोफणे (वय ३३, रा. पार्कसाईड, विक्रोळी, मुंबई) पुण्याहून मुंबईकडे घेऊन जात होता. बोरघाटात पोलीस चौकीजवळ या ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील चालणाऱ्या ट्रकला (एमएच १० सीक्यू ७४५९) पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ट्रकचालक सुहास गोफणे याच्यासह क्लीनर तानाजी दादासो तुपे (वय ४३, रा. ढोकाळवाडी, ता. खटाव, जि. सातारा) हे दोघे केबिनमध्ये अडकून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, आयआरबी टीम तत्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रकच्या केबिनमध्ये अडकलेल्यांना बाहेर काढले तसेच दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजूला घेऊन एक्सप्रेस वे वाहतूकसाठी सुरू झाला. या घटनेने एक तास वाहतूक ठप्प झाली होती.

# 'रोटरी'च्या पुढाकारातून ४० अंध बांधवांना दुर्गराज रायगडचे दर्शन



**महाड : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पुणे लोकमान्यनगर, रोटरी क्लब ऑफ महाड आणि रोटरी क्लब ऑफ पेण ओरायन यांच्या संयुक्त विद्यमाने ४० अंध बांधवांना नुकतेच किल्ले रायगडाचे विशेष दर्शन घडविण्यात आले. गेल्या पाच वर्षांपासून महेश घोरपडे यांच्या पुढाकारातून अंध बांधवांसाठी किल्ले दर्शनाचा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

मागील वर्षी लोहगडावर असतानाच रायगड दर्शनाची योजना निश्चित करण्यात आली होती. या उपक्रमासाठी सर्व अंध बांधवांना आदल्या दिवशी रात्री पाचाड येथे मुक्कामासाठी आणण्यात आले. पाचाड येथून किल्ले दर्शन व परतीची जबाबदारी रोटरी क्लब ऑफ पेण ओरायनने स्वीकारली, तर महाड व इतर रोटरी मित्रांनी यासाठी सहकार्य केले. सकाळी महाड रोटरी क्लबकडून दिलेल्या खाऊच्या शिदोरीसह चित्त दरवाज्यापासून प्रत्येक अंध बांधवांसोबत एक स्वयंसेवक असा सुमारे १०० जणांचा शिस्तबद्ध ताफा किल्ल्याच्या आरोहणासाठी निघाला. ओरायन क्लबने तयार केलेल्या टी-शर्टमुळे संपूर्ण मार्ग रोटरीमय झाल्याचे चित्र दिसून आले.

स्वयंसेवकांनी किल्ल्याची माहिती देत महाद्वार, हत्ती तलाव, होळीचा माळ, वैशिष्ट्यपूर्ण बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, हिरोजी इंदुलकर यांचे स्मारक आणि राजदरबार असा संपूर्ण गड अंध बांधवांना प्रत्यक्ष स्पर्शाने अनुभवता आला. रविवार असल्याने किल्ल्यावर मोठी गर्दी असतानाही भाविकांनी स्वयंस्फूर्तीने अंध बांधवांना दर्शनासाठी प्राधान्य दिले.

राजदरबार परिसरात गडावर पिठले, झुणका-भाकर असे वनभोजन देण्यात आले. त्यानंतर नाणे दरवाज्याने सर्व अंधबांधवांना खाली उतरवून सुखरूप पुण्याकडे रवाना केले.

या उपक्रमात पुण्याहून महेश घोरपडे, दामोदर अर्जुन वाडकर, अंजली कुलकर्णी, सुजाता वाघ; पेण येथून सुबोध जोशी, पर्णल कणेकर, संजय पाटील, संतोष पाटील, अमित देव, विलास लिमये, दर्पण व महेंद्र तसेच महाडहून रोटरी क्लबचे अध्यक्ष सुधीर मांडवकर, राजीव वनारसे, डॉ. चेतन सुर्वे, जगदीश भानुशाली, नेहा मेहता, विश्वनाथ नाजरे, महेश इब्रामपूरकर, नितीन जोशी यांनी विशेष सहकार्य केले. प्रकल्प समन्वयक पराग चांदे यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली सर्वच रोटरी क्लब सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## पोलीस हवालदाराचा मुलगा बनला लष्करी अधिकारी

**खालापूर : प्रतिनिधी**



देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससीच्या एनडीए (राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी) परीक्षेत रायगड जिल्ह्यातील मंथन संदीप नरुटे याने देशात अव्वल क्रमांक पटकावत लष्करी अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले आहे.

एप्रिल २०२५मध्ये झालेल्या यूपीएससी एनडीए परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला असून मंथनने ४९० क्रमांक मिळवत देशात अव्वल ठरला आहे. यानंतर १५ जानेवारी २०२६ रोजी त्याची अधिकृतपणे एनडीएमध्ये निवड झाली आहे. ही परीक्षा भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलातील अधिकारी पदांसाठी घेतली जाते. या यशामुळे मंथनची निवड रायगड जिल्ह्यासह पोलीस दलासाठीही अभिमानाची बाब ठरत आहे. त्याच्या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मंथनचे प्राथमिक शिक्षण दहावीपर्यंत खोपोली येथील कर्नियल कॉन्व्हेंट स्कूल येथे झाले. दहावीनंतर इंजिनिअर किंवा डॉक्टर होण्याचा पारंपरिक मार्ग न स्वीकारता लहानपणापासूनच असलेल्या यूपीएससी आणि देशसेवेच्या आवडीमुळे त्याने एनडीएची तयारी सुरू केली. वडील आणि नातेवाईक पोलीस दलात असल्याने गणवेशाबद्दल आणि देशसेवेबद्दल त्याच्या मनात विशेष आदर निर्माण झाला होता. या यशामागे त्यांची आई राणी यांच्या प्रचंड कष्टाचे आज चीज झाले आहे.

एनडीएच्या तयारीसाठी त्याने एका प्रशिक्षण अकॅडमीत प्रवेश घेतला. पहिल्या तीन प्रयत्नांत तो एसएसबी मुलाखतीपर्यंत पोहचला, मात्र अंतिम निवड होऊ शकली नाही. तरीही अपयशाने खचून न जाता बी.टेक इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत असतानाच त्याने एनडीएचा अभ्यास सुरू ठेवला. अखेर चौथ्या प्रयत्नात त्याला यश मिळाले आणि भारतीय नौसेनेतील अधिकारी पदाची संधी मिळाली.

मंथनचे मूळ गाव मिरेवाडी (ता. फलटण, जि. सातारा) आहे. वडील रायगड पोलीस दलात कार्यरत असल्याने तो लहानपणापासून खोपोली येथे वास्तव्यास आहे. त्याचे वडील संदीप नरुटे हे कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात हवालदार म्हणून कार्यरत आहेत. या निवडीनंतर मंथन आणि त्याच्या कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## श्री श्री रविशंकर यांचा बुधवारी महाड येथे अमृतसंध्या महासत्संग; मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**महाड : प्रतिनिधी**

पद्मभूषण श्री रविशंकर जी यांचे प्रथमच कोकणात आगमन होत असून ऐतिहासिक अशा महाड नगरीमध्ये येत्या २१ जानेवारी रोजी सायंकाळी अमृत संधी महासत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत माहिती देताना आयोजक कोकणवासी यांनी या अमृत सध्या महोत्सवामध्ये सहभागी होऊन श्री श्री रविशंकर यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५ वर्षपूर्तीनिमित व पद्मविभूषण श्री श्री रविशंकर यांच्या जन्मदिनी रायगड परिवाराच्या वतीने २१ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महाड येथील चिचकर मैदानावर कोकण अमृतसंध्या महासत्संग या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याबाबत माहिती देताना पांडुरंग शेळके अस्पियर मॅनेजमेंट लिंक महाराष्ट्र व नामदेव घोलप कार्यक्रम समूहक यांनी सांगितले की, या सत्संग महोत्सवासाठी जवळपास पंधरा हजार भाविक उपस्थित राहणार असून १८०हून अधिक देशातील स्वयंसेवक व भक्त या महासत्संग मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, या वेळी माहिती देताना नामदेव घोलप यांनी आर्ट ऑफ लिविंग येत्या या वर्षात ४५ वर्ष पूर्ण होत असून श्री श्री रविशंकर यांच्या जन्मदिनानिमित्त या भव्य अशा महा सत्संग कोकण अमृतसंध्या मेळाव्याचे आयोजन केले असून महाडकरांनी श्री रविशंकर यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा.

या मेळाव्याला श्री श्री रविशंकर यांचे स्वागत करण्यासाठी राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार असून रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत.

## वडघरच्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात 'पर्यावरण छावणी'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या जैवविविधता संवर्धन संशोधन केंद्रातर्फे रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यामधील वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये युवकांसाठी 'पर्यावरण छावणी' आयोजित करण्यात आली आहे. ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय निवासी युवक 'पर्यावरण छावणी'चा उद्देश पर्यावरणीय संकटांच्या आव्हानांना सामोरे जाण्यास युवकांना सक्षम बनवणे हा असून जैवविविधता अभ्यासक पार्थ बापट हे या शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक आहेत.

पर्यावरणीय प्रश्नांचे ऐतिहासिक, सामाजिक-आर्थिक व वैज्ञानिक आकलन, स्थानिक पर्यावरणीय समस्यांची ओळख व विश्लेषण, पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास, पर्यावरण व्यवस्थापन क्षेत्रातील करिअर संधी अशा विविध विषयांवर या शिबिरात मार्गदर्शन मिळणार आहे. निसर्गभ्रमंती, निसर्गखेळ, गावभेटी, चित्रपट, चर्चा, प्रकल्प अशा विविध स्वरूपात वरील विषय या शिबिरात शिकता येणार आहेत. जैवविविधतेवर विशेष भर असलेल्या पर्यावरण संकल्पना, मानव-पर्यावरण यांचे ऐतिहासिक नाते (इकोसिस्टम सर्व्हिसेस), कृषी व औद्योगिक समाजांचा पर्यावरणावर परिणाम, बदलत्या पर्यावरणाचा मानवी जीवनावर प्रभाव, पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम व उपाय या विषयांवर तज्ज्ञ या शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत.

वरील तीन दिवसीय निवासी युवक 'पर्यावरण छावणी'चा कालावधी हा मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजल्यापासून गुरुवार, ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत असणार आहे. १८ ते ३० वयोगटासाठी खुल्या असलेल्या या पर्यावरण छावणीचे प्रवेश शुल्क विद्यार्थ्याकरिता (पीजी) पर्यत १००० रुपये, इतरांना १५०० रुपये इतके आहे. मर्यादित जागा असलेल्या या पर्यावरण छावणीची नोंदणी सुरू झाली असून नोंदणीसाठी स्मारक कार्यालय - ७७७६९३७८४४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# अलिबाग लायन्स फेस्टीव्हल २३ जानेवारीपासून रंगणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने आयोजित करण्यात येणारा लायन्स अलिबाग फेस्टिव्हल यंदा २३ ते २७ जानेवारी या कालावधीत अलिबाग समुद्रकिनारी आयोजीत करण्यात आला आहे. मागील १९ वर्षांपासून हा फेस्टिव्हल यशस्वीपणे आयोजित करून अलिबागला एक वेगळी ओळख मिळवून दिली आहे.



फेस्टिव्हल केवळ अलिबागपुरता मर्यादित नसून रायगड जिल्हा तसेच राज्याच्या सीमांपलीकडील उद्योजकांना आपली उत्पादने सादर करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. यंदा फेस्टिव्हलमध्ये १७५ हून अधिक अत्याधुनिक स्टॉल्स उभारण्यात येणार असून, ग्राहकांना दर्जेदार व नाविन्यपूर्ण वस्तू एकाच छताखाली खरेदी करता येणार आहेत. खवय्यांसाठी यंदाचा फेस्टिव्हल खास पर्वणी ठरणार असून ५०हून अधिक व्हेज व नॉनव्हेज खाद्यपदार्थांचे स्टॉल्स विविध चवींची मेजवानी देणार आहेत. फेस्टिव्हलदरम्यान दररोज विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कराओके स्पर्धा, 'मी सुगरण' पाककला स्पर्धा, रांगोळी व पैठणी शो, शरीरसौष्ठव स्पर्धा, पेट अँड ब्रीड शो, स्टँडअप कॉमेडी तसेच सांगता समारंभात सांगीतिक कार्यक्रमांमुळे होणार आहे.

फेस्टिव्हलचे उद्घाटन २३ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. खासदर सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासह राजकीय, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

निधीचा सुयोग्य विनियोग या फेस्टिव्हलमधून मिळणारा निधी लायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्रदान, अवयवदान तसेच विविध आरोग्यविषयक उपक्रमांसाठी वापरण्यात येतो. याशिवाय चोंढी, अलिबाग येथे उभारण्यात येणाऱ्या २५ हजार चौरस फूटांच्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसाठीही हा निधी महत्त्वाचा ठरणार आहे. फेस्टिव्हल यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब ऑफ अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, महोत्सव समितीचे अध्यक्ष भगवान मालपाणी तसेच सर्व व सदस्य मेहनत घेत आहेत.

## मॅरेथॉनसाठी मध्य रेल्वेच्या विशेष गाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

टाटा मुंबई मॅरेथॉन २०२६च्या सहभागींच्या सोयीसाठी मध्य रेल्वेकडून १७/१८ जानेवारी २०२६ (शनिवार/रविवार मध्यरात्री) दरम्यान दोन विशेष उपनगरीय लोकल सेवा चालविण्यात येणार आहेत.

विशेष सेवा मध्ये मुख्य मार्ग - कल्याण-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष सेवा. विशेष गाडी कल्याण येथून ०२.३० वाजता सुटेल आणि मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ०४.०० वाजता पोहोचेल.

हार्बर मार्ग - पनवेल-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष सेवा विशेष गाडी पनवेल येथून ०२.२५ वाजता सुटेल आणि मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ०३.४५ वाजता पोहोचेल.

या दोन्ही विशेष गाड्या मार्गातील सर्व स्थानकांवर थांबतील. प्रवाशांनी याची नोंद घ्यावी व सुविधेचा लाभ घ्यावा.असे आवहान मध्य रेल्वे कडुन करण्यात आले आहे.

## माणगावात शेतकरी मेळावा, मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

किसान क्रांती संघटना माणगाव तालुका कार्यकारिणीच्या वतीने जिल्हास्तरीय शेतकरी मेळावा व मधुमक्षिका पालन प्रशिक्षण माणगाव येथे झाले.



या वेळी संघटनेचे राज्य अध्यक्ष टी.एस. देशमुख, कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहाचे डॉ. जीवन आरेकर, उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या जिल्हास्तरीय शेतकरी मेळाव्यात डॉ.जीवन आरेकर यांनी मधमाशी पालनावर मौलिक असे मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे यांनी शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिली. जिल्हाध्यक्ष भरत राणे यांनी संघटना बांधणीबाबत मार्गदर्शन केले.

मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रमास संघटनेचे उपाध्यक्ष श्रीधर जंजीरकर, शास्त्रज्ञ डॉ.मांजरेकर, तालुका कृषी अधिकारी आर.एस. कावळे, विस्तार अधिकारी अशोक मार्कंड, महाड अध्यक्ष योगेश साळुंके, मागणाव अध्यक्ष रघुनाथ गोसावी, राज्य संघटक विनायक देशमुख, सुरेश म्हस्के, कृषी सहाय्यक जयदीप थरकर, महीपत मांजरे, बाबू पालकर, बापू बक्कम, संतोष शिंदे, भगवान शिंदे, अजित तोंडलेकर, भास्कर गावडे आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोसावी यांनी उपस्थितांचे आभार मानून मेळाव्याची सांगता केली.

